कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २० डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

नृत्य शिक्षकाकडून लैंगिक अत्याचार

पुणे : नामांकित शाळेतील डान्स टीचरने विद्यार्थ्यांवरच लैंगिक अत्याचाराच्या घटनेने पुण्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणी शिक्षकानंतर आता संस्थाचालकालासुद्धा अटक करण्यात आली आहे. कर्वेनगर परिसरात असणाऱ्या नामांकित संस्थेत डान्स टीचर काम करत होता. तिथं त्याने अनेक विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार केल्याचं उघडकीस आलं. या प्रकरणी शिक्षकाच्या चौकशीत धक्कादायक अशी माहिती समोर आली होती.डान्स टीचरनंतर संस्थाचालकालाही अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या संस्थाचालकाचं नाव अन्वित सुधीर फाटक असं आहे.

नर्सिंग असिस्टंट पाहिजे

वात्सल्य ट्रस्ट शिशुगृह अलिबाग येथे पूर्णवेळ महिला नर्सिंगची आवश्यकता आहे. सदर उमेदवार ही नर्सिंग क्षेत्रातले शिक्षण झालेली व लहान मुलांबरोबर काम करण्याची आवड असलेली असावी.

इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज व प्रमाणपत्र यासह संस्थेच्या कार्यालयात दिनांक २७/१२/२०२४ रोजी दुपारी १२.००वा. उपस्थित राहावे.

पत्ता -वात्सल्य ट्रस्ट,घर नंबर १५१०/मयूर बेकरी मागे अलिबाग रायगड ४०२२०१

आजचा अग्रलेख

आंबेडकर नावाची फॅशन

वेधक

पॅथोलॉजी लॅबमधील महिलेचा विनयभंग

पनवेल : पॅथोलॉजी लॅबमध्ये रक्त तपासणीसाठी गेलेल्या ५० वर्षीय व्यक्तीने लॅबमधील महिलेसोबत गैरवर्तन करुन तिचा विनयभंग केल्याची घटना कामोठेमध्ये घडली. या प्रकरणातील आरोपी हनुमंत माने कामोठेत राहण्यास असून तो आपल्या परिसरातील लॅबमध्ये रक्त तपासणी करण्यासाठी गेला होता. यावेळी सदर लॅबमध्ये ३० वर्षीय महिला रक्त संकलनाचे काम करत होती. यावेळी पिडीत महिलेने माने याचे रक्त तपासणीसाठी घेतल्यानंतर त्याच्या हातावरील रक्त कॉटनने पुसले. त्यानंतर सदर कॉटन डस्टबीनमध्ये टाकत असताना, माने याने तिला पाठीमागून मिठी मारुन तिच्यासोबत गैरवर्तन केले. या प्रकारानंतर पिडीत महिलेने आरडा ओरड केली.

पोलिसाच्या घरातून १७ लाखांची चोरी

पनवेल : अज्ञात चोरटयानी कळंबोली मधील एलआयजी वसाहतीत राहणाऱ्या पोलिसाचे घर फोडून त्यांच्या घरातून सुमारे १७ लाख रुपये किंमतीचे वेगवेगळ्या प्रकारचे दागिने आणि रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चोरट्यांविरुध्द घरफोडीचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केली. या प्रकरणातील तक्रारदार अमोल म्हात्रे (वय ४१) कळंबोली सेक्टर-२ मधील एलआयजी वसाहतीत वुटुंबासह राहत असून, सध्या त्यांची नियुक्ती नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षात आहे. अमोल म्हात्रे यांच्या भावाच्या मुलीच्या वाढदिवस निमित्त त्यांचे सर्व कटुंबिय •> पान २ वर

महिलांचा विनयभंग करणाऱ्याला अटक

मुंबई : विदेशी महिला व तिच्या मैत्रीणीचा विनयभंग करणाऱ्या लक्ष्मण संतराम कुमार याला मालवणी पोलिसांनी अटक केली आहे. पीडित महिला स्पॅनिश नागरिक असून ती नोव्हेंबर २०२४ पर्यटन व्हिसावर भारतात आली होती. सोमवारी तिने समाज माध्यमावरून आयुर्वेदिक मसाज करणाऱ्या लक्ष्मणशी संपर्क साधला होता. त्यानंतर विदेशी महिला व तिची मैत्रीण दोघे मढ येथील त्याच्या बंगल्यावर गेले होते. त्यावेळी मसाज करताना आरोपीने त्यांना अश्लीलरित्या स्पर्श केला. यावेळी त्याच्या बाजूलाच टेबलावर त्याचा मोबाईल होता. त्याने मसाज करताना तिचे अश्लील फोटो आणि व्हिडीओ काढल्याचा तिला संशय आला होता.

नववर्षाच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज

गड, किल्ले, समुद्रकिनाऱ्यांवर येणाऱ्या पर्यटकांवर राहणार नजर

। अलिबाग । प्रतिनिधी ।

नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक रायगड जिल्ह्यात येण्याची तयारी करू लागले आहे. २५ डिसेंबरपासून पर्यटक जिल्ह्यात दाखल होणार आहेत. आनंदोत्सव साजरा करीत असताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून गड, किल्ले, समुद्रकिनारे, तलाव, नदी, धबधबा या पर्यटन स्थळी फिरण्यास येणाऱ्या पर्यटकांवर प्रशासनची नजर राहणार आहे. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी वेगवेगळ्या विभागाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाकडून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन त्याचा आढावा घेण्यात आला आहे.

सरत्या २०२४ या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि २०२५ या नुतन वर्षाचे स्वागत करण्यासाठी दहा दिवस शिल्लक राहिले आहेत. वेगवेगळ्या हॉटेल, कॉटेज, रेस्टॉरन्ट, फार्महाऊस २५ डिसेंबरपासून ते २ जानेवारी २०२५ पर्यंत बुकींग झाले आहे. ८० टक्केहून अधिक बुकींग झाली आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या हॉटेल व रेस्टॉरन्टमध्ये सवलती सुरु केल्या आहेत.

वेगवेगळ्या प्रकारचे आकर्षण सजावटही करण्याची तयारी केली आहे. काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे तयारीदेखील वेगाने सुरु आहे. समुद्रकिनारी, धबधबे, नदी, तलावांमध्ये फिरण्यास येणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड असणार आहे. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी नगरपालिका, ग्रामपंचायतीमार्फत सर्व समुद्रकिनारी, गड किल्ले, धबधब या ठिकाणी सुचनाफलक लावाण्यात येणार आहेत. गड, किल्ले, धबधबे, समुद्र किनाऱ्यांवर पोलीसांचा बंदोबस्त असणार आहे. शहरी व ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सुरक्षेच्या दृष्टीने पर्यटन स्थळी रुग्णवाहिका, बचाव साहित्य, रबरी बोट, लाईफ जॅकेट, जीवरक्षक, सुरक्षा गार्ड, गाईड आदी सुविधा उपलब्ध असणार आहेत.

गड किल्ल्यांवर जाणाऱ्या मार्गावर वन व्यवस्थापन समितीमार्फत सुचना फलक लावले जाणार आहे. स्थानिक प्रशिक्षित गाईड उपलब्ध असणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत स्वयंसेवकांना लाईफ जॅकेट, लाईफ बोयाज, टॉर्च रोपची व्यवस्था तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत केली जाणार आहे.

अति उत्साही पर्यटकांमुळे काही दुर्घटना घडल्यास समुद्रकिनारी तात्काळ शोध व बचाव मोहीम हाती घेतली जाईल. नगरपालिका, ग्रामपंचायतीमार्फत पर्यटनस्थळी घनकचरा व्यवस्थापनासाटी कार्यवाही केली जाणार आहे. त्या ठिकाणी स्वच्छता पथक, पार्किंगची व्यवस्था करण्यात येणार आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांनी रायगड जिल्ह्याच्या नैसर्गिक सौंदर्याचा आनंद लुटावा आणि नियमांचे पालन करावे असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

अनधिकृत सागरी खेळांवर होणार कारवाई

समुद्रकिनारी फिरण्यास येणाऱ्या पर्यटकांनी स्वतःची काळजी घेण्याच्या सूचना ध्वनीक्षेपकाद्वारे नगरपरिषद व ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येणार आहे. किनारी अनधिकृत वॉटरस्पोर्टस, ए.टी.व्ही. वाहने, पॅरासेलिंग, विविध वॉटर राईडस् आदी सागरी खेळ चालविणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात येणार आहे. पर्यटन स्थळांवर मनोरंजनासाठी चालणाऱ्या विविध खेळ व उपक्रमांसाठी कुशल मनुष्यबळ, सुरक्षा साहित्य व परवानगी घेतली असल्याची पाहणी संबंधित विभागाद्वारे केली जाणार आहे. याबाबत अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात वेगवेगळ्या विभागातील अधिकाऱ्यांची बैठका घेऊन सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासन नाताळ बरोबरच नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज असल्याचे चित्र आहे.

सर्व विभागासाठी नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत

कोणत्याही अपघाताप्रसंगी आपल्या विभागाकडून तात्काळ सक्षम प्रतिसाद मिळेल, अशी व्यवस्था करावी. कोणत्याही अपघाताची माहिती तत्काळ जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व नियंत्रण कक्षास सादर करावी, अशी सूचना देण्यात आली आहे. नियंत्रण कक्ष २४ तास सुरु राहणार असल्याचे ही सांगण्यात आले आहे.

शिस्तभंगाची होणार कारवाई

आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी कराव्यात, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पर्यटनस्थळांवरील पर्यटकांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांचा आढावा घेऊन शोध व बचाव पथके साहित्यांसह तत्पर ठेवावेत, सुरक्षेच्या उपाययोजनाअभावी घटना घडल्यास संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, असे सांगण्यात आले आहे.

> नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने तसेच नाताळ सणाच्या सुट्टीमुळे कोकणामध्ये विशेषतः रायगड जिल्ह्यामध्ये प्रसिध्द गड किल्ले, धबधबे, तलाव, नदी समुद्राकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. यापूर्वी समुद्रामध्ये बुडून, धबधबे, तलावाच्या ठिकाणी पर्यटकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांची संभाव्य जीवितहानी होऊ नये, यासाठी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी संबंधित विभागांनी आपल्या स्तरावरुन पुढीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात अशा सूचना करण्यात आल्या आहेत.
>
> – संदेश शिर्के
> निवासी उपजिल्हाधिकारी

रुग्णालयाजवळ धोकादायक होर्डींग

घाटकोपर येथील दुर्घटनेच्या पुनरावृत्तीची भिती

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग शहरात जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या जवळच अवाढव्य होर्डींग बेकायदेशीररित्या उभारण्यात आले आहे. ६० फुटी लोखंडी होर्डींग गेल्या दोन महिन्यांपासून उभे आहे. वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या होर्डींगमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मागील काही महिन्यापूर्वी घाटकोपर येथे होर्डींग कोसळून मोठी दुर्देवी घटना घडली होती. त्याची पुनरावृत्ती होण्याची भिती काँग्रेसचे शहरप्रमुख समीर ठाकूर यांनी व्यक्त केली आहे.

अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. लाखो पर्यटक वर्षाला भेटी देऊन येथील पर्यटनाचा आनंद लुटतात. समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर जिल्हा सामान्य रुग्णालय आहे. या रुग्णालयाच्याजवळच प्रवेशद्वारासमोर एक भले मोठे होर्डींग निवडणुकीच्या अगोदर उभारण्यात आले होते. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या जाहिरातीचे फलक लावले होते. गेली अनेक दिवस त्या फलकांवर शासकीय जाहीरात लावण्यात आली होती.

होर्डींग कोसळल्यामुळे गेल्या मे महिन्यात घाटकोपर येथे १६ नागरिकांचा बळी गेला. अलिबाग शहरात उभ्या असलेल्या होर्डींगबाबत संजय सावंत यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे विचारणा केली, असता होर्डींगसंदर्भात परवानगी मागणारा अर्ज आला नसल्याचे सांगण्यात आले आहे. नगरपालिकेने होर्डींग सबंधीत कंत्राटदाराकडून त्वरीत काढून टाकावे, होर्डींग लावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करावा अशी मागणी सावंत यांनी केली आहे.

आचारसंहितेच्या कालावधीत होर्डींगवरील फलक काढण्यात आले. गेल्या दोन महिन्यांपासून लोखंडी होर्डींग उभे आहे. या ठिकाणी पर्यटकांसह स्थानिकांची कायमच वर्दळ असते. त्यात नववर्षाच्या स्वागतासाठी हा परिसर पर्यटकांनी गजबजण्याची शक्यता आहे. त्यामुळे होर्डींगमुळे अनुचित घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

माणगाववाडीमध्ये पाणीटंचाई

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या माणगाव वाडीमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. माथेरानकडे जाणाऱ्या जलवाहिनीमधून पिण्याचे पाणी मिळत असते. मात्र माथेरान येथे जाणाऱ्या जलवाहिनीमधून पाणी पुरवठा होत नसल्याने माणगाववाडीमधील ग्रामस्थांचे तोंडचे पाणी पळाले आहे. दरम्यान, या ग्रामस्थांना सध्या डवऱ्याचे पाणी हंड्यात साठवून आणावे लागत असून माणगाव वाडीमध्ये ६० घरांची वस्ती आहे.

नेरळ-माथेरान घाट रस्त्यात माणगाव वाडी ही आदिवासी वाडी असून माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायतमधील भाग आहे. या गाडीच्या बाजूने माथेरान या शहरासाठी जाणारी जलवाहिनी टाकण्यात आली आहे. स्थानिक आदिवासी लोकांनी जलवाहिनी टाकण्यासाठी आपल्या जमिनी दिल्या आणि त्याबदल्यात वाडीमधील ६० घरांसाठी पिण्याच्या पाण्याची तरतूद करून घेतली. त्या जलवाहिनीमधून या आदीवासी वाड्यांना पाणी पुरवठा होतो. प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी पुरवठा केला जातो. तर वाडी मध्ये पाणी पुरवठ्यासाठी एक विहीर देखील असून त्या •> पान २ वर

पिण्यासाठी डवऱ्याचे पाणी

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय

माणगाव वाडीमध्ये शासनाची विनाअनुदानित आदिवासी आश्रमशाळा आहे. या शाळेत माथेरान नळपाणी योजनेच्या जलवाहिनीमधून पाणी दिले आहे. मागील काही दिवस माथेरानकडे जाणाऱ्या जलवाहिनीमधून पाणी पुढे जात नसल्याने आश्रमशाळेतील शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून तेथील प्रशासन टँकर मागवून पाण्याची सोय करीत आहेत.

> ग्रामपंचायतकडून माणगाव वाडीसाठी स्वतंत्र नळपाणी योजना करण्याची गरज आहे. त्यात उन्हाळयात माथेरान येथे असलेल्या पर्यटन हंगामातदेखील माणगाव वाडीमधील लोकांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत असतो. शासनाने जलजीवन मिशनमधून स्वतंत्र नळपाणी योजना करुन स्थानिक ग्रामस्थ आणि आश्रमशाळा यांच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढावा.
>
> – जैतू पारधी, माजी सदस्य, माणगाव ग्रामपंचायत

बोट दुर्घटना :

मुख्यमंत्र्यांनी सांगितलं अपघाताचं कारण

। उरण । प्रतिनिधी ।

गेट वे ऑफ इंडियावरुन एलिफंटाच्या दिशेने जाणाऱ्या बोटीला दुपारी तीनच्या सुमारास धडक बसली आणि या दुर्घटनेत १३ जणांना जीव गमवावा लागला. काही दिवसांपूर्वी कुर्ला बेस्ट बस अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला होता.

निलकमल ही प्रवासी बोट गेट वे ऑफ इंडियावरुन १२० प्रवाशांना घेऊन एलिफंटाच्या दिशेने जात होती. या बोटीला नौदलाच्या स्पीड बोटीने धडक दिल्याने हा अपघात झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. नौदलाच्या स्पीड बोटीला नवं इंजिन लावलं होतं. त्याची चाचणी सुरू होती. त्याचवेळी इंजिनमध्ये बिघाड झाला आणि बोटीवरील नियंत्रण सुटल्याने ही बोट प्रवासी बोटीला धडकल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या अपघातात १० प्रवाशांचा आणि तीन नौदलाच्या बोटीवरील कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. या अपघातातील १०१ जणांचा वाचवण्यात यश आलं आहे. •> पान २ वर

मुरुडमध्ये कपड्यांच्या दुकानाला आग

करोड रुपयांचे नुकसान, रोहामधील अग्निशमन दलाला पाचारण

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

मुरुड शहरातील मुख्य बाजारपेठमधील उमेश गोबरे यांच्या मालकीची एक मजली इमारतीमधील खालच्या गाळ्यातील विजय जैन यांच्या कपड्यांच्या दुकानाला गुरुवारी (दि.१९) आग लागली. या आगीत एक मजली इमारत जमीनदोस्त झाली. यामध्ये करोडो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र सहकार्य करणारे नागरिक सानी जैन यांच्या डोक्यावर इमारतीचे कौल पडल्याने त्यांना दुखापत झाली. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही बातमी मिळताच मुरुड तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस उप अधिक्षक विनित चौधरी, मुरुड जंजिरा नगरपरिषद, मुरुड पोलीस, तहसीलदार कार्यालयाचे कर्मचारी, अधिकारी यांनी पाहणी केली. परंतु अद्ययावत यंत्रणा नसल्याने आगीवर नियंत्रण मिळवता आले नाही.

रोजच्याप्रमाणे अशोक जैन देवळातून घरी परताना बाजुला असणाऱ्या विजय जैन यांच्या कपड्यांच्या दुकानामधुन धूर येत असल्याचे दिसले. त्यांनी तात्काळ विजय जैन यांना कळविले. मात्र आग मोठ्या प्रमाणात लागली होती. मुरुड नगरपरिषदेच्या अग्निशमन दलासह हिंदू व मुस्लिम बांधवांनी एकत्र येत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग आटोक्यात आणणं कठिण झालं होतं.

अखेर काही जवानांनी व नागरिकांनी घराला बाहेरून शिडी लावुन घरातील सिलेंडर बाहेर काढले. ही आग विझविण्यासाठी अग्निशमनाचे ६ बंब, टँकर ६, पाच हजार लिटरचे १० ड्रम पाणी वापरले. तरी आग आटोक्यात येत नसल्याने अखेर रोहा येथील तज्ज्ञ सागर दहिमबेकर आणि सहकारी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. त्यांनी उरलेली आग विझवली आणि मौल्यवान वस्तू व साहित्य काढून दिले. सहा तासांच्या परिश्रमानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले.

ही आग कशी लागली याचा तपास मुरूड पोलीस करित आहेत. मुरूड बाजारपेठेतील रस्ते अरूंद त्यात मुरूड नगरपरिषदेकडे अग्निशमन दलाची एकच गाडी असल्याने ही आग आटोक्यात आणण्यात अपयश येत होते. तरी नगरपरिषदेने अजुन एक अग्निशमन दलाची गाडीची मागणी करावी, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडुन मिळत आहे.

कारागृहात बसून थेट नातेवाईकांशी साधता येतो संवाद

कैद्यांसाठी ई-मुलाखत ठरतेय फायदेशीर

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

कैद्यांना भेटायला येणाऱ्या नातेवाईकांना आता कारागृहात येण्याची गरज नाही. ई-मुलाखतीच्या माध्यमातून कैद्यांना त्यांच्या नातेवाईकांसोबत कधीही संवाद साधता येत आहे. संगणकाच्या एका क्लीकवर नातेवाईकांशी कैद्यांना ई-मुलाखतीद्वारे भेटण्याबरोबरच मनमोकळे बोलता येते. जिल्हा कारागृहातील कैद्यांसाठी हा उपक्रम फायदेशीर ठरत आहे.

सरखेल कान्होजी आंग्रे कालीन वास्तूमध्ये अलिबाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी जिल्हा कारागृह गेल्या अनेक वर्षापासून आहे. या कारागृहात वेगवेगळ्या गुन्ह्यांतील कैद्यांना ठेवले जाते. ८० पुरुष व दोन महिला कैदी राहतील इतकी या कारागृहाची क्षमता आहे. परंतु वाढत्या गुन्हेगारीमुळे या कारागृहात १८० पुरुष व १० महिला असे एकूण १९० कैदी राहत आहे. या कैद्यांवर लक्ष ठेवण्याचे काम कारागृह अधीक्षक अशोक कारकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले जाते. कैद्यांच्या प्रत्येक संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याबरोबरच कैद्यांमध्ये सुधारणा निर्माण करण्याचे कामही वेगवेगळ्या उपक्रमांमधून केले जाते. कैद्यांना भेटण्यासाठी त्यांचे नातेवाईक कारागृहात येतात. कैद्यांना भेटण्यासाठी अर्ज भरणे. त्यानंतर कारागृहात देणे, वरिष्ठांची मान्यता घेणे ही लांबणीची प्रक्रीया कैद्यांच्या नातेवाईकांना डोकेदुखी ठरत राहिली आहे. त्यामुळे अपर पोलीस महासंचालक प्रशांत बुरडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कारागृहात ई-मुलाखतची व्यवस्था करण्यात आली.

कारागृहात संगणकाची व्यवस्था करण्यात आली. कारागृहाच्या नावाची एक लिंक ओपन केली जाते. कारागृहाच्या अधिकाऱ्यांकडून मान्यता मिळाल्यावर ती लिंक ओपन करून कैद्यांना त्यांच्या नातेवाईकांसोबत बोलण्याची संधी दिली जाते. या ई-मुलाखतीमुळे कामाच्या वेळी कैदी कधीही त्यांच्या नातेवाईकांसोबत ऑनलाईन पध्दतीने बोलू शकतात. त्यांच्याशी संवाद साधू शकतात. कैद्यांच्या नातेवाईकांची होणारी धावपळ, वेळ व पैसा बचत होण्यासाठी ई-मुलाखत फायदेशीर ठरत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ई - मुलाखतीमार्फत कैदी त्यांच्या नातेवाईकांसोबत कमीत कमी पंधरा मिनिटे बोलतात.

> कारागृहातील कैद्यांना वेगवेगळ्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.ई-मुलाखतीमुळे कैदी त्यांच्या नातेवाईक ऑनलाईन पध्दतीने संवाद साधू शकतात. ही व्यवस्था फारच उपयोगी ठरत आहेत. कैदी कारागृहात बसून बाहेर असलेल्या नातेवकांशी बोलत असल्याने कारागृहात येण्याचा वेळही नातेवाईकांचा वाचत आहे.
>
> – अशोक कारकर
> अधीक्षक, जिल्हा कारागृह, रायगड

३०४ बेवारस वाहनांवर पालिकेची कारवाई

■ ५७ बेवारस वाहनांना दंड

■ वाहनचालकांचे धाबे दणाणले

। पनवेल । वार्ताहर ।

महापालिका कार्यक्षेत्रात पथपदांवरती उभी असलेली नादुरूस्तीची, भंगार व पडिक दुचाकी, चारचाकी बेवारस वाहनांवरती आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार महानगरपालिकेच्यावतीने कारवाई करण्यात येत असून आता पर्यंत ३०४ बेवारस वाहनांवर कारवाई करण्यात आली असून पालिका हद्दीत सार्वजनिक रस्त्यांवरील सुमारे ५७ बेवारस वाहनांना दंड आकरण्यात आला आहे. इतर बेशिस्त वाहन पार्किंग करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांचे कारवाईच्या भीतीने धाबे दणाणले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३० व २३१ नुसार महानगरपालिका आयुक्त यांची लेखी परवानगी घेतल्याशिवाय महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावर वा पदपथापर कोणतीही वस्तु ठेवण्यास मनाई आहे. तसेच महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांनुसार महानगरपालिका आयुक्त यांना रस्त्यावरील व पदपथावरील ठेवण्यात आलेली वस्तु किंवा वाहन नोटीस न देता काढून टाकण्याचा अधिकार प्राप्त आहे. सदर काम ासाठी महापालिकेने ठेकेदाराची नेमणूक केली आहे. महापालिका हद्दतील चारही प्रभागांमधील सार्वजनिक रस्त्यांवरील बेवारस वाहनांचे सर्वेक्षण करण्यात आले असून या वाहनांवरती सात दिवसांची नोटीस चिकटविण्यात येत आहे. सात दिवसांमध्ये संबधित वाहन मालकाने वाहन न नेल्यास, वाहनांचे टोईंग करून महापालिकेने निश्चित केलेल्या यार्डमध्ये वाहन नेले जाईल.प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सहकार्याने सदर वाहन मालकाचा शोध घेऊन , वाहन मालकास वाहन घेऊन जाण्यासाठी ४५ दिवसांची नोटीस देण्यात येते. या दरम्यान वाहन मालक वाहन घेऊन जाण्यास उपस्थित झाल्यास त्यास महापालिकेने वाहनाच्या प्रकारानुसार निश्चित केलेल्या दंड रकमेचा भरणा केल्यानंतर संबधित वाहन मालकास वाहन सुपूर्द करण्यात येते. ४५ दिवसात जर वाहन मालकाने वाहन नेले नाही तर पुन्हा एकदा सात दिवसाची नोटीस देण्यात येते. या नोटीशीची दखल वाहन मालकाने न घेतल्यास सदर वाहनाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मूल्यांकन करण्यात येईल. त्यानंतर सदर वाहनांचा लिलाव महापालिकेमार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी दिली. पनवेल महानगरपालिकेने आतापर्यंत केलेल्या सर्वेक्षणानुसार पालिका हद्दीत सार्वजनिक रस्त्यांवरील सुमारे ३०४ बेवारस वाहनांची नोंद झाली आहे. यामध्ये दुचाकी, रिक्षा, कार, टेम्पो, ट्रक, जड वाहने, बस यांचा समावेश आहे. प्रभाग कार्यालयामार्फत वाहनांवरती नोटीसा चिटकविण्यात येतआहेत. आतापर्यंत सुमारे ५७ वाहनांवरती वाहने स्थलांतरणाची कारवाई करण्यात आली असून त्यांना दंड थोटावण्यात आला आहे.

शहराची लोकसंख्या वाढत असल्याने वाहनांची संख्याही वाढली आहे. दिवसेंदिवस दुचाकी, चारचाकी वाहने रस्त्यावर येत आहेत.

> “पनवेल येथील आदर्श हॉटेल नाका ते गावदेवी मंदिराजवळील मधल्या रस्त्यात रस्त्याच्या दोन्ही बाजूला चार चाकी वाहने बेकायदेशीरपणे उभी असल्याने वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असून पालिकेने अश्या बेशिस्त वाहनचालकांना दंड आकारल्यास अशा लोकांना चांगली अद्दल घडेल आणि पनवेलकरांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल.
> – चारुदत्त पाद्धे, वाहन चालक”

> “एकाच ठिकाणी उभ्या असलेल्या दु आणि चार चाकी वाहणांनमुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे निर्दशनास आले असून अशा बेशिस्त वाहनमालकांवर पालिकेच्या माध्यमातून कारवाई हाती घेण्यात आली असून वाहंचालकांनी बेकायदेशीरपणे वाहन सर्वजनिक रस्त्यावर उभे करू नये.
> – मंगेश चितळे आयुक्त, पालिका”

लोक अदालतीतून २ हजार ७०१ ग्राहकांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा

। रायगड । प्रतिनिधी ।

तालुकास्तरावर १४ डिसेंबरला आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीतून कल्याण व भांडुप परिमंडलातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित तसेच वीजचोरीची दाखलपूर्व व प्रलंबित अशी २ हजार ७०१ प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढण्यात आली.

महावितरणच्या उपलब्ध सवलतीचा लाभ घेत संबंधित ग्राहकांनी ६ कोटी २१ लाख रुपयांचा भरणा केला.

कल्याण परिमंडलातील कायम स्वरुपी वीजपुरवठा खंडित केलेल्या तसेच वीज चोरीची दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने सोडवण्यासाठी लोक अदालतीत ठेवण्यात आली होती.

त्यात २ हजार २७२ प्रकरणांमध्ये तडजोड होऊ शकली व ५ कोटी ७० लाख रुपयांचा भरणा झाला. यात कल्याण परिमंडलातील कल्याण मंडल एकमध्ये ३२२ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ८० लाख ६८ हजार रुपयांची वसुली झाली.

कल्याण मंडल दोनमध्ये १ हजार १८ प्रकरणे ३ कोटी २४ लाख रुपयांच्या वसुलीने सामोपचाराने मिटवण्यात आली. वसई मंडलात ७९० प्रकरणांच्या निपटाऱ्यातून १ कोटी ५३ लाख रुपयांची वसुली होऊ शकली. तर पालघर मंडल कार्यालयांतर्गत १३ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या १४२ ग्राहकांची प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली.

भांडुप परिमंडलातील ठाणे मंडलात १८ लाख रुपयांचा भरणा करणाऱ्या २६१ ग्राहकांची प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. वाशी मंडल कार्यालयांतर्गत १३५ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन ३० लाख रुपयांची वसुली झाली.

तर पेण मंडलात तीन लाखांचा भरणा करणाऱ्या ३३ ग्राहकांची प्रकरणे सामोपचाराने मिटवण्यात आली.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM E –TENDER NOTICE
(THIRD & FOURTH CALL)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

Sr. No.	Tender/Notice No.	Particulars of Tender	Estimated Cost of Tender
1.	**Tender No:-** EE/EHV (O &M) /DIVN/MHD/Tech/E-Tender-18/IVth Call/2024-25 Dtd.19.12.2024 **RFx No.7000031499**	**Sub.:-Fourth Call** for SRM E-Tender for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2024-25.	Rs. up to 7,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS)
2.	**Tender No:-** EE/EHV (O &M)/DIVN/MHD/Tech/Third Call/E-Tender-37/2024-25 Dtd.19.12.2024 **RFx No. –7000033219**	**Sub:-Third Call** for SRM E-Tender for the work of repairing/overhauling of Air Compressors of 220kV/100kV CB at various Substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25.	Rs.2,17,808/- (including GST + 1% Labour CESS)

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-+GST.

Bid submission is from 19.12.2024 @ 00:00 hrs to 28.12.2024 @23:59Hrs for above tender For further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

Contact Person:- The Addl.Executive Engineer, (O): Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

-Sd/-
Executive Engineer (I/c) EHV(O&M) Dn. Mahad

उरणमध्ये ५० टक्के जागांचे मालक परप्रांतीय

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील शेतकरी अल्पभूधारक होताना दिसत आहे. सद्यस्थितीत तालुक्यातील ५० टक्क्यांहून अधिक जागांचे मालक हे परराज्यातील किंवा अन्य जिल्ह्यातील आहेत.

तालुक्यातील अनेक ठिकाणी अन्य राज्यातील लोकांनी जमिनी खरेदी केल्याचे व्यवहार झाले आहेत. त्यामुळे अनेक ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात घरे, रो-हाऊसेस, बंगलो, बांधकामाच्या नोंदी दर महिन्याला होताना दिसत आहेत. शेकडो एकर जागा खरेदी केलेले परप्रांतीय मालकांना गाव पातळीवर विरोध होऊ नये म्हणून मंदिर, सार्वजनिक इमारती, सार्वजनिक सुविधा अशा ठिकाणी ते देणगी देत असून स्थानिक पुढाऱ्यांचे खिसेही गरम केले जात असल्याची चर्चा सुरु आहे.

तालुक्यातील अनेक जागांचे व्यवहार हे बनवाबनवी करून झाले असल्याचीही ओरड होताना दिसत आहे. स्थानिकांकडून खरेदी केलेल्या जागेवर विकसकांनी रो-हाऊसेस, बंगलो बांधून शेकडो लोकांना त्याची विक्री केली आहे. यातील अनेक ठिकाणी विकसकांना विक्री केलेल्या जागेत जागा मालक मजूर म्हणून राबताना दिसत आहेत.

तालुक्यातील पूर्वजांनी शेकडो एकर जागा आपल्या पुढील पिढीसाठी जतन करून ठेवल्या होत्या. अगदीच गरज भासली तर जागा गहाण ठेवली जात होती आणि अशा जमिनी सोडवून ती परत मिळवली जात होती. मात्र आता त्याच वडिलोपार्जित जागा विकून स्थानिक लोक नवी मुंबई, उलवा, द्रोणागिरी नोड व मुंबईसारख्या ठिकाणी खोली विकत घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. गावातील जागा विकल्याने तालुक्यातील अनेकांचे कायम वास्तव्य हे मुंबईत होताना दिसत आहे. गावाला केवळ सणासुदीला तो येताना दिसत आहे. शासनाकडून मिळणाऱ्या धान्यामुळे तालुक्यातील शेतीही ओसाड पडण्याच्या मार्गावर आहे. शेती ओसाड ठेऊन करायची काय म्हणून ती विकली जात असून भावी पिढीसाठी चिंतेचे बाब ठरली आहे.

दासगावच्या तलावाचा कायापालट होणार

। महाड । वार्ताहर ।

महाड तालुक्यातील दासगाव गावामध्ये असलेल्या तलावाचे रूप आता बदलणार आहे. तलावाच्या सुशोभिकरणासाठी आमदार भरत गोगावले यांच्या माध्यमातून निधी उपलब्ध झाला असून या सुशोभिकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. यामुळे या परिसराचा विकास आणि कायापालट होणार असल्याची भावना दासगावकरांनी व्यक्त केली.

ऐतिहासिक महाड शहराजवळ असलेल्या दासगाव मध्ये असलेले तलावाच्या सुशोभिकरणासाठी आणि शासकीय विश्रामगृहाच्या नवीन इमारतीसाठी शासनाकडून निधी मंजूर झाला आहे. गेली अनेक वर्ष दासगाव मधील तलाव आणि शासकीय विश्रामगृहाच्या नूतनीकरणासाठी निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी सातत्याने ग्रामस्थांकडून करण्यात येत होती. येथे असलेल्या शासकीय विश्रामगृह शेजारीच तलाव आहे. सदर तलाव कधी बांधण्यात आलेले आहे याची नोंद नसली तरी दासगाव मध्ये शिवकालीन दौलत गड असल्याने या तलावाला तितकेच महत्त्व आहे. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे महाड मधील सामाजिक क्रांतीच्या लढ्यासाठी आले असता ते बोटीतून दासगाव येथे उतरले होते आणि याच विश्रामगृहात थांबले होते अशी नोंद आहे. यामुळे या विश्रामगृहाची दुरुस्ती किंवा नूतनीकरण व्हावे अशी मागणी सातत्याने केली जात होती. चौथ्यांदा निवडून आलेले आमदार भरत गोगावले यांनी पाठपुरावा करून या दोन्ही कामांसाठी भरीव निधीची तरतूद करून घेतली.

साधारण दोन एकर परिसर असलेल्या या तलावाचा विकास व्हावा यासाठी सातत्याने ग्रामस्थांकडून प्रयत्न केले जात होते. काही वर्षांपूर्वी भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी देखील या तलावाला भेट देऊन निधी उपलब्ध करून देऊ असे सांगितले होते. या तलावामध्ये असलेले पाणी आणि गाळ काढून तलावाच्या चहुबाजूने गॅबियन पद्धतीची भिंत उभी केली जाणार आहे. तलावाच्या चहुबाजूने पथमार्ग आणि त्यावर पथदिवे, बसण्यासाठी आसनांची व्यवस्था, छोटेसे गार्डन अशा कामांचा समावेश केला गेलेला आहे. तलावाच्या सुशोभिकरणासाठी सुमारे तीन कोटी सत्तर लाख रुपये मंजूर झाले आहेत.

दर काम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे शेजारी असलेल्या शासकीय विश्रामगृहाच्या इम ारतीसाठी देखील पाच कोटी पंचावन्न लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली आहे. शासकीय विश्रामगृहाची तीन मजली इमारत असून यामध्ये छोटे रूम, कॉन्फरन्स हॉल, किचन अशी सुविधा उपलब्ध होणार आहे. या कामामुळे दासगाव मध्ये परिसरातील नागरिकांचा ओघ वाढवून येथील तलाव परिसरामध्ये पर्यटनाचा विकास होऊन स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

दासगाव मध्ये सुक्या मासळीचा तालुक्यातील प्रसिद्ध असा आठवडी बाजार भरला जातो. यामुळे या ठिकाणी संपूर्ण महाड तालुक्यातील ग्राहक सुकी मासळी खरेदी करण्यासाठी येत असतात. त्याचप्रमाणे २००५ मध्ये या ठिकाणी दरड आली होती त्यावेळेस आणि त्यानंतरही देखील वेळोवेळी आपत्ती उद्भवल्या नंतर याच विश्रामगृहाचा आधार घेण्यात आला होता. विशेष म्हणजे या तलावावर 'हु तु तू तू' चित्रपटाची आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या चित्रपटाची शुटिंगदेखील झाली होती. यामुळे दासगावमधीलहा तलाव प्रसिद्ध आहे.

मावेजाला अभय योजनेला मुदत वाढ

पनवेल : मावेजामुळे अभिहस्तांतरण प्रक्रिया सुलभ होण्यासाठी जाहीर केलेल्या अभय योजनेला सिडकोने ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदत वाढ दिली आहे. कामोठ्यातील एकता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अमोल शितोळे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सचिवालय कक्ष कार्यालयाला निवेदन दिले होते.

सरकारी अधिकारी व कर्मचारी निवडणुकीत व्यस्त राहिल्याने नागरिकांना कागदपत्रे मिळण्यास उशीर झाला आहे. त्यामुळे नागरिकांना अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी दम छाक होत आहे. कामोठ्यातील एकता सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अमोल शितोळे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सचिवालय कक्षाकडे निवेदनाद्वारे अभिहस्तांतरण प्रक्रिया सुलभ होण्यासाठी जाहीर केलेल्या अभय योजेनला मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती. या योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली असल्याची माहिती सिडको शहरसेवा विभागाने शितोळे यांना लेखी पत्राद्वारे दिली आहे.

पान १ वरून

बोट दुर्घटना : मुख्यमंत्र्यांनी सांगितलं अपघाताचं कारण

या बोटीला नौदलाच्या बोटीने धडक दिल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु नौदलाकडून त्याचा नकार करण्यात आला.

दरम्यान, नीलकमल बोटीत क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी होते. बोटीची क्षमता ८० असताना त्यातून ११० जण प्रवास करत होते. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतूक करणाऱ्या बोट मालकावर गुन्हा दाखल होणार आहे. अद्याप पूर्ण माहिती मिळाली नाही. या घटनेची नौदल आणि मुंबई पोलीस चौकशी करणार आहे.

बोटीवर तब्बल ११० जण असल्याची माहिती मुंबई महानगरपालिकेकडून (बीएमसी) अधिकृतपणे देण्यात आली. विविध रुग्णालयामध्ये दाखल असलेले प्रवाशी ११० होते. त्यामुळे क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी बोटीत असल्याचे सिद्ध झाले. दरम्यान, नीलकमल बोटीला धडकणाऱ्या नौदलाच्या स्पीड बोटीत तांत्रिक बिघाड झाल्याचा संशय नौदलाकडून व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात अधिकृत माहिती नौदलाकडून देण्यात येणार आहे.

माणगाववाडीमध्ये पाणीटंचाई...

विहिरीचे पाणीदेखील ग्रामस्थ वापरतात. मात्र गेल्या १५ दिवसांपासून केवळ दोनच दिवस माणगाव वाडीमधील नळाला पाणी आले आहे. माथेरानला जाणाऱ्या नळपाणी योजनेचे उल्हास नदी येथून माथेरानकडे जाणारी पाणी पुरवठा यंत्रणा मागील १५ दिवसांपासून बंद आहे. त्यात केवळ दोनवेळा नळाला पाणी आले असल्याने माणगाव वाडीमधील ग्रामस्थांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.

नळाला पाणी येत नसल्याने शेवटी ग्रामस्थ डोक्यावर हंडे घेवून माथेरान घाट रस्त्यावर चालत येतात. त्या ठिकाणी श्री गणेश मंदिराच्या मागे एक झरा असून त्या झऱ्यामध्ये साचणारे पाणी येथील आदिवासी महिला साठवून घरी घेवून पिण्याच्या पाण्याची तहान भागवत आहेत. त्या पाण्याच्या झऱ्यामधून फार कमी प्रमाणात पाणी मिळत असून स्थानिक महिलांना दोन हांडे भरून घेण्यासाठी तासभर थांबून राहावे लागते. तर त्या ठिकाणी परिसरातील गुरे देखील पाणी पिण्यासाठी येत असल्याने स्थानिक महिला आधी गुरांसाठी पिण्याचे पाणी देण्याचा प्रयत्न करतात.

पोलिसाच्या घरातून १७ लाखांची चोरी

वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी पेण, सोनखार येथे गेले होते. तर अमोल म्हात्रे सीबीडी बेलापूर येथील नवी मुंबई पोलीस नियंत्रण कक्षात रात्रपाळीच्या ड्युटीवर गेले होते. या कालावधीत अमोल म्हात्रे यांचे घर बंद असल्याने चोरट्यांनी संधी साधुन पहाटेच्या सुमारास त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडला. त्यानंतर चोरट्यांनी अमोल म्हात्रे यांच्या घरातील सुमारे १७ लाख रुपये किंमतीचे वेगवेगळे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरुन नेली. सकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास अमोल म्हात्रे यांच्या घराच्या वरील मजल्यावर राहणाऱ्या भाडेकरुला म्हात्रे यांच्या घराचा कडी कोयंडा तोडल्याचे आणि दरवाजा उघडा असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी अमोल म्हात्रे यांना फोनवरुन याबाबतची माहिती दिली. त्यानंतर म्हात्रे यांनी घरी धाव घेऊन पहाणी केली असता, घरामध्ये चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर अमोल म्हात्रे यांनी कळंबोली पोलीस ठाण्यामध्ये चोरीबाबत तक्रार दाखल केली.

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड)

ज.म.र अर्ज ६१/२०२४

जाहिर नोटीस

प्रति,
श्री. दिलीप गजानन म्हात्रे
मु. पो. झिराड, अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत झिराड, सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे मौजे झिराड, ता.अलिबाग येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांची आजी कै. भागीर्थी पांडु उर्फ पांडुरंग म्हात्रे यांचा मृत्यु दि.१०/१२/१९८४ रोजी मौजे झिराड, ता.अलिबाग येथील राहत्या घरी झाला होता. २. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत झिराड येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत झिराड यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन दि.१८/०१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १८/१२/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग सही/-
तारीख : १८/१२/२०२४ **(विक्रम पाटील)**
तहसिलदार अलिबाग

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकतीमधील श्री सागर एकनाथ मुळीक व श्री जयवंत एकनाथ मुळीक यांचे मालकीचे व ताबा वहिवाटीतील ०-२५-०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र खरेदी घेणेचा व्यवहार निश्चित केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकानी माझे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे सहाण, ता. अलिबाग, जि. रायगड येथे खालील वर्णनाची शेती मिळकत

गट क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पैसे.
१३०	१-०९-००	२६-३४

पैकी सदर मिळकतीचे सातबारा अभिलेखात दर्शविण्यात आलेले श्री सागर एकनाथ मुळीक व श्री जयवंत एकनाथ मुळीक यांचे मालकीचे व ताबा वहिवाटीतील ०-२५-०० हे.आर.चौ.मी. क्षेत्र, आकार रू. ६-४४ पै. अशा वर्णनाची मिळकत तसेच सदर मिळकतीकरीता सर्व प्रकारच्या वापराकरीता सहाण गट क्रमांक १०४/१/१ या मिळकतीमधून उपलब्ध असलेला ९ मीटर रूंदीचा निरंतर रस्ता

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग, **ॲड. निलेश अशोक म्हात्रे**
दिनांक :- २०/१२/२०२४ ''गुरुकृपा'' महर्षी कर्वे रोड
अलिबाग- रायगड
मोबा.नं. ९८५०४८६९४५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन
मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

जमीन मालकाचे नाव	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
कल्पिका किरण कदम धनश्री किरण कदम धार्मिका किरण कदम अनामिका किरण कदम	५५	३	०-२३-३०	०.१५

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २०/१२/२०२४

ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर
पत्ता : कोर्ट व्ह्यू को.ऑप.हौ. सोसायटी शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्टसमोर, कर्जत रायगड
मो. ९५९५३२४२३४/९५६१५७५६२६

ॲड. राजेंद्र पी. निगुडकर
पत्ता : ओम श्री भाग्योदय को.ऑप.हौ.सो. कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड
मो. ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

फोन नं. २४५५३५

ग्रुप ग्रामपंचायत नागांव
मु.पो.नागांव, ता.अलिबाग जि.रायगड, पिन-४०२ २०४

जावक क्र. ३००९ दिनांक : १९/१२/२०२४

जाहीर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत नागांव, ता.अलिबाग जि.रायगड कडून १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालीलप्रमाणे साहित्य पुरविणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती

अ क्र.	निधीचा स्त्रोत	अंदाजित रक्कम	कामाचे नाव	काम पूर्ण करण्याची मुदत
१	१५ वा वित्त	१,००,०००/-	महिला जिम साहित्य खरेदी करणे.	३ महिने
२	१५ वा वित्त	३,००००००/-	घरोघरी सुका ओला कचरापेटी वाटप करणे.	३ महिने
३.	१५ वा वित्त	२,००००००/-	घंटागाडी देखभाल दुरूस्ती करणे व इंधन खर्च	६ महिने
४.	१५ वा वित्त	७०,००० /-	ग्रामपंचायत हद्दीतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करणे	६ महिने
५.	१५ वा वित्त	८४,००० /-	अंगणवाडी विद्यार्थ्यांना खेळाचे साहित्य पुरविणे	३ महिने
६	१५ वा वित्त	४४,०९४/-	महिला प्रशिक्षण राबविणे	६ महिने
७	१५ वा वित्त	१,००,०००/-	युवक युवतींसाठी उपजीविका वृद्धी प्रशिक्षण करणे.	६ महिने

१) निविदे/दरपत्रके मोहरेबंद पाकीटात मा.सरपंच ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि.२१/१२/२०२४ ते २७/१२/२०२४ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १०.०० ते १.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

३) कोणत्याही मंजूर निविदा/दर पत्रके संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

५) यासाठी आलेल्या निविदा/दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा/दरपत्रके किंवा सर्व निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा/दरपत्रके फेटाळण्याबाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.

६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रके दि.३०/१२/२०२४ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/- सही/-
सौ.श्वेता संजय कदम **सौ.हर्षदा निखील मयेकर**
ग्रामविकास अधिकारी, **सरपंच**
ग्रुप ग्रामपंचायत नागांव **ग्रुप ग्रामपंचायत नागाव**
ता.अलिबाग जि.रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक रवि महेंद्र देसाई, रा. टेलिकॉम फॅक्टरी जवळ, ए विंग/१, गुलमोहर को. ऑ. हौ. देवनार बाग, टि एफ डोनर एसओ, मुंबई ४०००८८ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर. पॉ.)	आकार (रू. पैसे)
१३	२ अ/२/२	१.३०.०	०.९३

पैकी विकी केलेले क्षेत्र
६३ गुंठे

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्येध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.२०/१२/२०२४ **ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस एल.एल.बी.
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

शासकीय कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या तोंडावर बोट | मुख्यमंत्र्यांनी लक्ष देणे गरजेचे

। उरण । वार्ताहर ।

आपल्या विविध कामाकरिता सर्व सामान्य जनतेला शासकिय कार्यालय गाठावे लागते. परंतु, कागदपत्राच्या अजाणतेपणामूळे येथे असलेले दलाल लहान-सहान कामांकरिता या लोकांना लक्ष्य करुन त्यांना आर्थिक भुर्दंड देत आहेत. याबाबत कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना माहिती असतानाही अशा दलालावंर अंकुश न लावताच तोंडावर बोट ठेवून गप्प बसत आहेत. त्यांचे असे गप्प बसण्यामागील काय कारण असावे? असा प्रश्न निर्माण होत आहे.

उरण तालुका हा तिसऱ्या मुंबईच्या दिशेने वाटचाल करत आहे. त्यामुळे येथील तहसील कार्यालयात शहरासह ग्रामीण भागातील नागरिक विविध कामे घेऊन येत असतात. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिकांचा यात समावेश असतो. एखाद्या महत्वाच्या कामासाठी दाखला हवा असतो. त्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांमध्ये किंवा एखाद्या शासकीय योजनांसाठी एखादा कागद कमी असल्यास दाखल्याचा अर्ज त्रुटींमध्ये निघतो. याकरिता अधिकारी स्तरावर कुठलेही मार्गदर्शन होत नाही. त्यामुळे सर्व सामान्य जनतेला आपला पैसा आणि वेळ खर्चून अनेक वेळा हेलपाटे मारावे लागतात. परंतु, एखादा कागद कमी असलेला अर्ज दलालामार्फत सादर झाल्यास विना त्रुटी तो पास होतो, हा अनेक सुज्ञ नागरिकांचा अनुभव आहे.

तसेच, उरण तहसील कार्यालयाबरोबरच दुय्यम निबंधक, महावितरण, कृषि, वन, पंचायत समिती, उरण भूमी अभिलेख कार्यालयात तर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांपेक्षा दलालांचीच संख्या अधिक दिसते.कार्यालयाजवळ बेकायदेशीर बस्तान बसविलेल्या टपरी ठिकाणी हे हमखास आढळतात. शासकीय कार्यालयात कोणीही कर्मचारी वा अधिकारी योग्य ते मार्गदर्शन करत नसल्यामुळे याचा फायदा हे दलाल घेत असतात. संबंधित कार्यालयात येणारा आर्थिक परिस्थितीने जर्जर झालेला शेतकरी किंवा सर्व सामान्य जनता यांची दलालांकडून बाहेरच अडवणूक होते. संबंधित काम कसे करून घ्यायचे याचा सल्ला देतात. नाहिलाजाने आपल्या खिशाला आर्थिक भुर्दंड देत त्यांना दलालांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे भ्रष्टाचाराची किड नियंत्रणात आणण्यासाठी राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उरण येथील तहसील कार्यालयाबरोबर इतर शासकीय कार्यालयातील कामकाजाकडे लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी सर्व सामान्य जनतेकडून करण्यात येत आहे.

> उरण तहसील कार्यालयात एकच अधिकुत सेतू केंद्र सुविधा असताना अनेकांनी शासकीय अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने टपऱ्यांमधून आपला धंदा सुरू केला आहे. काही दलालांची शासकीय कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसोबत उठबस वाढली आहे. शिवाय, त्यांच्यासोबत चहापाणी घेणे, नाश्ता, पार्टी करणे अशी त्यांची दीनचर्याही सुरू झाली आहे. हा प्रकार दलालांसाठी पोषक ठरत आहे. तरी, मंत्र्यांनी हे कुठे तरी थांबविणे गरजेचे आहे.
>
> – एस.एम. पाटील, शेतकरी, उरण

मोहोपाडा बाजारात दुकानदारांना 'लक्ष्मणरेषा'

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा बाजारपेठेत शिस्त राहिली नसल्याने वाहतूक कोंडीसह अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे ग्रुप ग्रामपंचायत वासांबे-मोहोपाडा आणि स्वच्छता समिती यांच्यातर्फे 'माझी वसुंधरा ५.०' अंतर्गत मोहोपाडा मुख्य बाजारपेठेतील दुकानदारांना स्वच्छता, प्लास्टीक बंदी आणि दुकाना व्यतिरीक्त जागा पूढे सरसावू नये यासाठी शिस्तीचे धडे देण्यात आले.

यावेळी दुकानदार, वाहनचालक, फेरीवाले यांना प्रबोधन करण्यात आले. प्लास्टिक बंदी पाळावी असे आवाहन करीत १ जानेवारीपासून प्लास्टिक आढळल्यास दंडात्मक करावाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच, कोणीही दुकानदारांनी रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या पांढऱ्या पट्ट्याच्या पुढे दुकान लावल्यास ग्रामपंचायतीकडून कारवाई करण्यात येणार आहे. ग्राहकांनीही दुकानासमोर अस्ताव्यस्त वाहने लावू नयेत आदी सूचना यावेळी करण्यात आल्या.

नेरळ स्थानकाला नवीन रूप

। नेरळ । प्रतिनिधी ।

मध्य रेल्वेवरील नेरळ रेल्वे स्थानकात येणारे पर्यटक प्रवासी यांच्यामुळे या स्थानकाला महत्व आहे. या स्थानकाचे महत्व लक्षात घेऊन या स्थानकात नव्याने रंगरंगोटी करण्याचे काम मध्य रेल्वे प्रशासनाने हाती घेतले आहे.

नेरळ स्थानकातील पादचारी पुल व निवारा शेडच्या उद्घाटनाच्या निमित्ताने रेल्वेचे अधिकारी नेरळ येथे येणार आहेत. त्यासाठी नेरळ स्थानकाला नवीन रुपडे आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. मात्र, मध्य रेल्वे प्रशासनाच्या या कामाबद्दल प्रवासी खुश असून रेल्वेचे अधिकारी हे दरवर्षी कर्जत-नेरळ भागात यायला हवेत, अशी सूचना देखील प्रवासी करीत आहेत.

खाऱ्या पाण्यामुळे शेतीचे नुकसान

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण समुद्र किनाऱ्यावरील शेतीचे समुद्राच्या भरतीपासून संरक्षण करणारी बांधबंधिस्ती कमजोर झाली आहे. या नादुरुस्त बांधांना समुद्राच्या भरतीच्यावेळी खाडीतील पाणी येथील भात शेतीत शिरू लागले आहे. याकडे शासनाच्या खारबंधिस्तीकडे खैरलांड विभागाच्या दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे जमीनी नापीक होण्याची शक्यता वाढली आहे. खाडी बांधालगतच्या २ हजार हेक्टर जमिनी धोक्यात आल्या आहेत. या जमिनीचे संरक्षण आणि संवर्धन करण्याची मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे .

एकेकाळी उरण तालुका हा शेतीसाठी प्रसिद्ध होता. हा तालुका भाताचे कोठारच होते. मात्र, गेल्या ५० वर्षात हजारो एकर जमीनी केंद्र व राज्य सरकारच्या औद्योगिक प्रकल्प बंदर आणि खाजगी उद्योगधंद्यांसाठी संपादित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे उरणम धील शेतजमिनी कमी झाल्या आहेत. तरी देखील उरणच्या नागाव, केगाव व चाणजे तसेच उरण पूर्व विभागातील खोपटे, कोप्रोली चिरनेर, आवरे, गोवठणे, वशेणी, पुनाडे, बोरकर, धुतुम, मोठीजुई आदी खाडी किनारच्या जमीनी भात पिकाखाली आहेत. मात्र, या जमिनीच्या परिसरात समुद्राच्या भरतीच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी आलेल्या नैसर्गिक वाटा बंद किंवा बुजवण्यात येत आहेत. त्यामुळे शेतीच्या सुरक्षेसाठी बांधण्यात आलेले बांध नादुरुस्त होऊन, भात शेतीत पाणी शिरू लागले आहे. यात खोपटे, मोठीजुई, बोरखार, टाकीगाव या परिसरातील शेतीमध्ये पाणी घुसून शेतीचे नुकसान होत असल्याची माहिती येथील शेतकऱ्यांनी दिली.

माथेरानमध्ये मातीच्या परीक्षणाची गरज

। माथेरान । वार्ताहर ।

माथेरानमध्ये मागील काही वर्षांपासून हृदयरोग, अस्थमा, कॅन्सर, अर्धांगवायू अशा आजारांचा सामना करत आजही या व्याधींवर औषधोपचार घेण्यासाठी आर्थिक बाबतीत संघर्ष करावा लागत आहे. प्रदूषण मुक्त अशी माथेरानची ओळख जरी असली तरीसुद्धा अनेकजण या आजारांनी मृत्यू पावले आहेत. त्यासाठी इथल्या मातीमध्ये काही दोष आहेत का, याची तपासणी तज्ज्ञांच्या परीक्षणानुसार झाल्यास इथल्या स्थानिकांना दिलासा मिळू शकेल, असे बोलले जात आहे.

एकीकडे विपुल असणारी वनसंपदा लोप पावत चालली आहे. वारा वादळ नसताना सुध्दा अनेकदा झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत. मजबूत आणि रुबाबदार दिसणारी वृक्षवल्ली अचानक उन्मळून कशी काय पडतात, याचाही उलगडा होत नाही. यापूर्वी इथे बाहेरील आजारी पर्यटक शुद्ध हवा आणि भरपूर प्रमाणात ऑक्सिजन असणाऱ्या याठिकाणी दहा ते पंधरा दिवस मुक्कामी राहून उत्तम प्रकारे ठीक होत असत. परंतु, सद्यस्थितीत पूर्वी पर्यटकांची संख्या रोडावली आहे. यामागचे नेमके काय कारण असावे, या विवंचनेत स्थानिक नागरिक दिसत असून येथील मातीत प्रदूषणाच्या बाबतीत काही दोष आढळून येतात का, याचे परीक्षण तज्ज्ञांच्या मदतीने होणे गरजेचे आहे, असे बोलले जात आहे.

हॅपी थॉट्सचा ध्यान महोत्सव

। कोर्लई । वार्ताहर ।

अलिबाग येथील ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉमध्ये तेज ज्ञान फाऊंडेशनतर्फे आयोजित रौप्यमहोत्सवी ध्यान महोत्सव नुकताच पार पडला. यावेळी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक सरश्री यांची 'ध्यानाचे महत्व' या विषयावर एक व्हिडिओ क्लिप दाखविण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ॲड. के.डी. पाटील, डॉ. श्रीकांत पाटील, ॲड. निहा राऊत, तेज ज्ञान फाऊंडेशनचे प्रवक्ते प्रभात कोळवणकर हे होते. यावेळी सर्व आदरणीय पाहुण्यांना स्मृतीचिन्ह, रोपटे व पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला अलिबाग परिसरातील जवळपास दोनशे प्रेक्षक उपस्थित होते. यावेळी, गजेंद्र दळी, डॉ.हुलवान, डॉ. चंद्रकांत वाजे, अशोक देशमुख, रमेश नाईक, डॉ. गांधी यांचा सन्मान करण्यात आला.

चौथ्या दिवशीही उपोषण सुरूच

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषद हद्दीतील ज्या नागरी समस्यांविरोधात शहरातील नागरिकांनी दि.१६ डिसेंबरपासून बेमुदत साखळी उपोषण सुरु केले आहे. गुरूवारी (दि.१९) उपोषणाचा चौथा दिवस असून नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, कर्जत न्यायालयातील वकील संघटनेच्या वकिलांनी उपोषण स्थळी बसून आपला पाठिंबा दिला आहे. नगरपरिषदेच्या भोंगळ कारभाराविरुद्ध गेल्या चार महिन्यांपासून निवेदन, चर्चा करून तसेच नगरपरिषदेला योग्य ती मुदत देऊन सुद्धा नागरी समस्या सुटल्या नाहीत. यामुळे कर्जत नगरपरिषद प्रशासनाविरुद्ध कर्जतकरांनी बेमुदत साखळी उपोषण सुरु केले आहे.

शिरसे पुलाचे काम अंतिम टप्प्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील वासरे परिसरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर शिरसे आणि आवळस ही गावे जोडण्यासाठी पूल बांधण्यात यावा अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती.२०२३ मध्ये उल्हास नदीवर शिरसे गावाच्या बाहेर पुलाचे बांधकाम सुरु झाले असून या पुलाचे काम अंतिम टप्पयात आले आहे. या पुलामुळे पळसदरी रेल्वे स्टेशनकडे जाणे अधिक सोपे आणि जवळचे ठरणार आहे.

उल्हास नदी हि ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी समजली जाते. या नदीवर शिरसे गावाजवळ पूल बांधान्यता यावा अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती. शिरसे गावाच्या पलीकडे आवळस, नेवाळी अशी गावे असून तेथून जाणारा रस्ता हा पुढे कर्जत-खोपोली रेल्वे मार्गवरील पळसदरी येथे जातो. त्यामुळे शिरसे येथे पूल झाल्यास आकूरले पासूनच्या नोकरदारांना तसेच विद्यार्थ्यांना कर्जत स्थानकात जाऊन उपनगरीय लोकल पकडण्यासाठी जाण्याची गरज भासणार नाही.

बायोमेट्रिक नादुरूस्तीचा गैरफायदा

। तळा । वार्ताहर ।

■ नव्याने यंत्रणा लावण्याची मागणी

शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा केला असला तरी कर्मचारी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे तालुका पातळीवरील तहसील कार्यालयासह सर्व शासकीय कार्यालयात कर्मचाऱ्यांच्या हजेरीसाठी बायोमेट्रिक यंत्रणा लावण्यात यावी, अशी मागणी सामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित नसल्याने अनेक अधिकारी व कर्मचारी उशिरा येत असल्याचे दिसून येत आहे. हजेरी नोंदवहीवर सही करून कर्मचारी निघून जाऊ नये, यासाठी शासनाने कार्यालयात सकाळी येतेवेळी व सायंकाळी जातेवेळी बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक केली आहे. मात्र, तळा तालुक्यातील बहुतांश शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित नसल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे फावत आहे. कोरोना काळात संसर्गाच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने अधिकारी व कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी बंद केली होती. याचा गैरफायदा कर्मचारी घेत आहेत. यामुळे बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा कार्यान्वित करणे गरजेचे आहे. तहसील कार्यालय, पंचायत समिती, भूमिअभिलेख कार्यालय, गटशिक्षण अधिकारी कार्यालय, वनपरिक्षेत्र कार्यालय, तालुका कृषी व कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांसह अनेक इतरही कार्यालयांमध्ये नवीन कार्यालयीन वेळेनुसार क्वचितच अधिकारी निर्धारित वेळेत हजर झालेले पाहायला मिळत आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे प्रतिपादन

भवितव्यासाठी कौशल्य विकास महत्वाचे

। अलिबाग । प्रतिनिधी ।

उद्योजकता विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून बंद्यांना चांगले वायरमन निर्माण होण्याची संधी मिळणार आहे. या उपक्रमातून रोजगार खुले करता येणार आहे. कारागृहातून बाहेर पडल्यावर समाजात वावरत असताना या प्रशिक्षणाचा बंद्यांना नक्कीच फायदा होणार आहे. तसेच, भवितव्य घडविण्यासाठी कौशल्य विकास महत्वाचे आहे, असे प्रतिपादन गुरुवारी (दि.१९) रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आयोजित अलिबागमधील जिल्हा कारागृहातील बंद्यासाठी उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे शुभारंभ जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थित पार पडले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी लिड बँकेचे जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, जिल्हा कारागृह अधिक्षक अशोक कारकर, जिल्हा कौशल्य विकास केंद्रातील अधिकारी अमिता पवार, आयटीआयचे अमोल चव्हाण, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ बडोद्याचे अधिकारी, आदर्श पतसंस्थेचे पदाधिकारी व अधिकारी, कारागृहातील कर्मचारी व बंदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, जिल्हा कारागृहातील सर्वच बंद्यांना प्रशिक्षण मिळावे या भुमिकेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्यामुळे विद्यूत जोडणी, दुरुस्तीचे प्रशिक्षण या उपक्रमातून बंद्याना मिळणार आहे. हा उपक्रम महत्वाचा ठरणार आहे. प्रशिक्षणातून अनेक वायरमन तयार झाल्यास त्याचा फायदा नक्की होईल. या कौशल्य विकासातून मन रमण्याची संधी बंद्यांना प्राप्त होणार आहे. पंधरा दिवस हे प्रशिक्षण असणार आहे.

यासाठी जिल्हा उद्योग केंद्रासह महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व आयटीआयच्या अधिकाऱ्यांनी योगदान दिले आहे. घराघरात विद्यूत जोडणी व उपकरणे आहेत. वीजेशिवाय कोणीच राहू शकत नाही. विद्यूत जोडणीसह उपकरणे बसविण्यासाठी तारतंत्रीला प्रचंड मागणी आहे. त्यांची प्रत्येकाला गरज आहे. बंद्यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन चांगले शिक्षण घ्यावे, असे आवाहन जावळे यांनी केले आहे.

> बंद्याना चांगले प्रशिक्षण मिळावे. त्यांना रोजगाराची संधी निर्माण व्हावी यासाठी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार बंद्यासाठी प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. कारागृहातील बंद्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवून त्यांच्यामध्ये अमुलाग्र बदल निर्माण करण्याचा प्रयत्न कायमच कारागृहाच्या माध्यमातून होत असल्याचा आनंद आहे. ग्रंथालयासह वेगवेगळे खेळदेखील कारागृहात घेऊन बंद्याना घडविण्याचा व त्यांच्यामध्ये चांगले विचार निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.
>
> – अशोक कारकर, जिल्हा कारागृह अधीक्षक

मितेषच्या न्यायासाठी कॅन्डल मार्च

। गडब । वार्ताहर ।

अलिबाग समुद्रकिनारी झालेल्या हत्याकांडात पेण तालुक्यातील गडब गावातील मितेष जनार्दन पाटील याची धारदार हत्याराने वार करून निर्घृणपणे हत्या करण्या आली होती. या गुन्ह्यातील आरोपींना जास्तीत जास्त कठोर शिक्षा मिळून त्याच्या कुटुंबियांना न्याय मिळावा आणि प्रशासनाला या घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी वाशीच्या श्रद्धा सबुरी मित्र मंडळाच्यावतीने गडब येथे कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी साई मंदिरात मेणबत्ती पेटवून मितेशला श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी, या निघ्रुण हत्येचा निषेध व्यक्त करुन मितेशला न्याय मिळाला पाहीजे व आरोपीना कठोर शिक्षा व्हायला पाहीजे. तसेच, हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, अशी मागणी करुन मितेशला न्याय मिळवुन देण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार आसल्याचे उपस्थितांनी मितेशला श्रध्दाजंली वाहताना सांगितले आहे.

आंबेडकर नावाची फॅशन

वाल्या कोळी लोकांना लुटून त्यांच्या हत्या करीत होता. नारदाने त्याला रामनामाचा जप करण्याचा सल्ला दिला. त्यातूनच पुढे वाल्याचा वाल्मिकी झाला. अमित शाह नावाचे एक आधुनिक नारदमुनी या देशात अवतरले आहेत. त्यांना नवीन रामायण घडवायचे आहे. त्यासाठी नवीन वाल्मिकी हवा आहे. ते म्हणताहेत अरे काय ते सारखे आंबेडकरांचे नाव घेता, त्याऐवजी जय श्रीराम म्हणा. तुम्हाला आम्ही सात जन्म स्वर्गात ठेवू. आंबेडकरांचे नाव घेणे हे हत्या करून पापांचे रांजण भरण्यासारखेच आहे. ते बंद करा. हे नवे नारदमुनी स्वतः काही काळ तडीपार होते. पापांचे कितीही रांजण भरलेले असले तरी ते जय श्रीरामच्या नावाखाली बुडवता येतात असा त्यांचा स्वानुभव आहे. त्याचीच दीक्षा सर्वांना देण्यासाठी ते कळ लावत फिरत आहेत. पण जुन्या नारदमुनींच्या काळातला राम हा सत्यवचनी होता. त्याने पित्याच्या वचनासाठी एका क्षणात वनवास पत्करला होता. आजचा माजी तडीपार नारदमुनी इडी वगैरेंना हाताशी धरून विरोधकांना वनवासात धाडण्यासाठी विशेष प्रसिध्द आहे. त्यांच्या कारभाराचा जुन्या सत्यवचनी रामाशी काडीचाही संबंध राहिलेला नाही. तसा तो असता तर उत्तर प्रदेशात उन्नाववर दलित महिलेवर अत्याचार झाल्यावर हे मुनी तेथे धावून गेले असते. गुजरातेत दलितांवर अत्याचारांच्या अनेक घटना होत असतात. हे गुर्जर नारदमुनी त्यावेळी गांधारीसारखे डोळ्यावर पट्टी ओढून गप्प राहतात. आजकाल आंबेडकर फॅशन झाली आहे, असे विधान शाह यांनी मंगळवारी राज्यसभेत केले. तेव्हा आंबेडकरांचे नाव घेऊन विरोधक लोकांची मते मिळवतात ही मनातली ठसठस बाहेर आली. आंबेडकरांचे नाव घेऊन आपण अधिक पुरोगामी आहोत हे विरोधकांना दाखवायचे असते असे त्यांना कदाचित म्हणायचे होते. ते इतक्यावरच थांबले असते तर मनातले विष मनातच राहिले असते. पण ते बाहेर आले. तसे ते एक ना एक दिवस येणारच होते.

आयुष्ये बदलणारा मंत्र

याचे कारण पुढे जाऊन शाह यांनी ही 'फॅशन' करणाऱ्यांना दिलेला सल्ला सल्ला. ते म्हणाले की, याऐवजी लोकांनी जर इतक्याच वेळा देवाचे नाव घेतले तर त्यांना पुढचे सात जन्म स्वर्ग मिळाला असता. शाह यांच्या या विधानातून सरळ सरळ एक किडकी, नतद्रष्ट आणि दुष्ट मनोवृत्ती प्रकट होते. आंबेडकरांचे नाव घेणे म्हणजे काहीतरी वाह्यात गोष्ट आहे, किंवा, खरे तर पापच आहे असे शाह सुचवत आहेत. गेल्या शतकापर्यंत काही जातींच्या लोकांचा स्पर्शदेखील तथाकथित वरच्या वर्गांना चालत नव्हता. तीच नीच मनोवृत्ती शाह यांच्या उद्गारांतून बाहेर आली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीत वाढलेल्या शाह यांनी दलितांना खालच्या जातीचे मानणं, आपण त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहोत असं समजणं हे स्वाभाविक आहे. राजकारणात ही मनोवृत्ती मुखवट्याआड दडवलेली असते. ती अशी कधीतरी अचानक बाहेर येते. शिवाय देवाचे नाव घेऊन स्वर्ग मिळतो वगैरे कल्पना या खास ब्राह्मणी रचनेला पोषक आहेत. अमुक व्रत करून भटजींना पैसे दिले, तमुक उपास केला की स्वर्ग मिळतो, अमुक जातींना आपोआप स्वर्ग मिळतो, तमुक जातींची कर्मे त्यांना नरकात घेऊन जातात हे विचार या रचनेने पसरवले आहेत. शाह यांच्या वक्तव्यातून आंबेडकरांचे नाव घेतले तर नरक मिळेल असे सुचवले जाते असेही कोणाला वाटू शकेल. फॅशन अनेक प्रकारच्या असतात. अमुक सणाला किंवा लग्नाला अमुकच पोषाख घालण्याची, अमुकच हॉटेलात जेवण्याची, इंग्रजीत बोलण्याची इत्यादी. इतरांवर छाप टाकण्यासाठी, इतरांहून आपण मोठे आहोत असे दाखवण्यासाठी किंवा आपली आवडनिवड ही सामान्यांपेक्षा श्रेष्ठ आहे असे त्यातून दाखवले जाते. आंबेडकरांचे नाव घेण्याची असल्या थिल्लर गोष्टींबरोबर तुलना करणे हा खास भाजपचा उच्चवर्णीय चेहरा आहे. या देशातले कोट्यवधी दलितांच्या जीवनाला आंबेडकर या नावाचा स्पर्श झाला आणि त्यांचे जीवन बदलून गेले. त्यामुळे त्यांच्यासाठी तो केवळ एक शब्द नाही. तो मंत्र आहे.

हिंदू कोड बिलाला विरोध

शाह यांनी आपल्या भाषणात नेहरू आणि आंबेडकर यांच्यात कसे मतभेद होते, आम्ही आंबेडकरांची कशी स्मारके बांधली अशा भरमसाठ बेमतलब गोष्टी सांगितल्या. मात्र आंबेडकरांच्या राज्यघटनेला तेव्हाच्या जनसंघाचा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा तीव्र विरोध होता. हिंदू कोड बिलामध्ये महिलांना समान अधिकार देण्याची तरतूद होती. स्त्रियांना घटस्फोट देण्याचे तसेच विधवांना व मुलींना संपत्तीत मुलांच्या बरोबरीने हक्क देण्याचाही प्रस्ताव होता. याला मुख्यतः जैन, गुजराती, मारवाडी तसेच सधन उच्चवर्णीय हिंदू समाजाचा विरोध होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पाठिंबा देणारे हेच लोक होते. त्यामुळेच संघाने आंबेडकरांच्या घटनेवर आणि नंतर हिंदू कोड बिल इत्यादींवर प्रखर टीका केली. हे आपल्या परंपरेच्या विरोधातील आहे असे सांगितले. नेहरुंचा याबाबत आंबेडकरांना पाठिंबा होता. मात्र संसदेत हा प्रस्ताव मांडण्यासाठी त्यांच्यापाशी पुरेसे बहुमत नव्हते. तेव्हा जनसंघ इत्यादींनी नेहरू व आंबेडकरांना पाठिंबा का दिला नाही याचे उत्तर खरे तर अमित शाह यांनी द्यायला हवे. दुर्दैवाने, काँग्रेसवाले आपलाच इतिहास विसरले आहेत व ते केवळ नेहरुंच्या बचावासाठी पुढे येतात. आंबेडकरांचे खरे शत्रू संघ आणि त्यांचे परिवारवाले होते. यांनीच सतत राखीव जागांना विरोध केला. आज ते स्मारके वगैरे केली म्हणून सांगत आहेत तो निव्वळ ढोंगी देखावा आहे. फॅशनचा आरोप करायचाच झाला तर तो भाजपवर करायला हवा. बाबासाहेबांनी भारत एक हिंदूराष्ट्र झाला तर हा देश म्हणून नष्ट होईल असा इशारा दिला. जन्मलो तरी त्याच हिंदू धर्मात मी मरणार नाही असे ते म्हणाले व तसे त्यांनी केले. आंबेडकर हे जणू संघाचे स्वयंसेवक होते आणि नेहरू त्यांचा द्वेष करत होते असे भासवण्याची फॅशन मोदी व शाह रूढ करू पाहत आहेत. प्रत्यक्षात, बाबासाहेब आणि कोट्यावधी लोकांनी हिंदू धर्माचा राजीनामा का दिला याचा जाब या दोघांना विचारायला हवा.

श्रद्धांजली

शंभर कोटी मुले हवामानबदलाच्या विळख्यात

मिलिंद बेंडाळे

जगभरातील शंभर कोटींहून अधिक, विशेषत: भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक आणि नायजेरिया अशा कमी विकसित देशांमध्ये राहणाऱ्या मुलांना हवामानबदलामुळे वाढत्या धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यांना आधीच स्वच्छ पाण्याची अनुपलब्धता, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. त्याबरोबर आता या धोक्याचा सामना करावा लागत आहे.

'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' (युनिसेफ) ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात येत्या काही वर्षांमध्ये मुलांच्या दृष्टीने पर्यावरणाच्या वाढत्या धोक्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या अहवालानुसार, येत्या काही दशकांमध्ये म्हणजे २०५० पर्यंत मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागणार आहे. अहवालानुसार २०५० च्या पिढीला आताच्या तुलनेत जास्त उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. अभ्यासानुसार, २०५० पर्यंत जगातील तापमान आताच्या जवळपास आठपट वाढू शकते. याचा अर्थ असा आहे, की मुलांना अधिक तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल. याव्यतिरिक्त, २००० च्या तुलनेत पुराचा धोका तिप्पट होऊ शकतो. त्यामुळे मुले आपल्या घरातून आणि शाळांमधून विस्थापित होऊ शकतात. 'युनिसेफ'च्या अहवालानुसार येत्या काही वर्षांमध्ये उष्णतेमुळे जंगलात आग लागण्याचा धोका वाढणार असून २०५० पर्यंत हा धोका २००० च्या तुलनेत दुप्पट होऊ शकतो. त्यामुळे मुलांच्या जीवाला आणि मालमत्तेला धोका निर्माण होऊ शकतो. वातावरणातील बदलामुळे, वाढलेली उष्णता-पूर-दुष्काळ यामुळे मुलांच्या भवितव्यासाठी मोठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. कारण हवामान बदलामुळे त्यांच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि जीवनमानावर खोलवर परिणाम होऊ शकतो. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात म्हटले आहे की हवामानबदलाच्या धोक्याचा सामना करणाऱ्या या मुलांसाठी तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे. मुलांना अन्नातून आधीपासूनच आवश्यक प्रमाणात प्रथिने देऊ न शकणाऱ्या देशांमध्ये हवामान बदलांना तोंड देण्यासाठी एक योजना तयार करावी लागेल, जेणेकरून मुलांचे सुरक्षित आणि निरोगी भविष्य सुनिश्चित करता येईल.

जगातील कोट्यवधी मुले सध्या मोठ्या धोक्याच्या छायेखाली आहेत. हवामानबदलामुळे मोठा विद्ध्वंस होऊ शकतो. जगातील ३३ देशांमध्ये येणारा काळ मुलांसाठी सर्वात धोकादायक असू शकतो. हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांचा या देशांवर सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. आश्चर्याची बाब म्हणजे जगातील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात यादीत समाविष्ट असलेल्या या देशांचे योगदान फारच कमी आहे. यादीत समाविष्ट असलेले हे ३३ देश, ज्यात भारताचाही समावेश आहे, एकत्रितपणे केवळ नऊ टक्के वायू उत्सर्जित करत आहेत. असे असूनही, या देशांमधील मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींसारख्या वातावरणातील बदलांमुळे सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.या समस्येमध्ये सर्वात जास्त सहभाग असलेले देश सुमारे ७० टक्के वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. यापैकी फक्त एका देशाला मुलांसाठी सर्वाधिक धोका असलेल्या देशांमध्ये स्थान देण्यात आले आहे. याचा अर्थ हवामानबदलामुळे या समस्येला फारसे जबाबदार नसलेल्या देशांमधील मुलांचे सर्वाधिक नुकसान होत आहे. हवामानबदलाचे परिणाम अतिशय असमानपणे पसरत असल्याचे या परिस्थितीवरून दिसून येते. हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणाऱ्या देशांच्या मुलांवर जास्त परिणाम होत आहे, तर जास्त उत्सर्जन करणाऱ्या देशांच्या मुलांवर हा परिणाम कमी आहे.

'चिल्ड्रेन क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार, मध्य आफ्रिकन रिपब्लिकला ८.७ गुणांसह मुलांसाठी हवामानबदलाचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून स्थान देण्यात आले आहे. यानंतर नायजेरिया आणि चाड ८.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. भारत ७.४ गुणांसह २६ व्या स्थानी आहे. पाकिस्तान (७.७ गुण) आणि अफगाणिस्तान, बांगलादेश, इथियोपिया ७.६ गुणांसह चौदाव्या आणि पंधराव्या स्थानी आहेत. लिंचेस्टीन हा युरोपीयन देश २.२ गुणांसह मुलांसाठी हवामान बदलापासून सर्वात सुरक्षित देश मानला गेला असून या यादीत शेवटच्या म्हणजेच १५३ व्या क्रमांकावर आहे. युनिसेफ (युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमर्जन्सी फंड) ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जी मुले आणि मातांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहे. हा संयुक्त राष्ट्रांचा एक भाग आहे. १९४६ मध्ये विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरातील मुलांना, भेडसावणाऱ्या समस्या लक्षात घेऊन त्याची स्थापना करण्यात आली. जगातील मुलांचे जीवनमान सुधारणे हे 'युनिसेफ'चे उद्दिष्ट आहे. त्यांचे शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ही संस्था काम करते. 'युनिसेफ' मुलांसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, शुद्ध पाणी, पोषण आणि शिक्षण यासारख्या आवश्यक मूलभूत सेवा पुरवते. याव्यतिरिक्त ती हिंसा, शोषण आणि भेदभाव दूर करण्यासाठी कार्य करते. गरिबी, युद्ध किंवा इतर आपत्कालीन परिस्थितींचा मुलांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या देशांमध्ये ही संस्था विशेष सक्रिय आहे. येथे युनिसेफ जगभरातील मुलांच्या हक्कांसाठी मोहीम राबवते आणि मुलांसाठी धोरणात्मक बदल आणि चांगल्या सेवा साध्य करण्यासाठी सरकार आणि इतर संस्थांसोबत काम करते.

जगातील सर्वात लहान बेट राष्ट्र असलेल्या नाउरूमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन अत्यंत कमी आहे. आकाराने खूप लहान असलेल्या या देशाची लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचे एकूण उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालु या देशात हरितगृह वायू उत्सर्जन खूप कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे त्याचा लहान आकार आणि मर्यादित औद्योगिकीकरण. भूतानमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन खूपच कमी आहे. याचे कारण तेथे अधिक जंगले आणि वनक्षेत्रे आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. माली हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय कमी औद्योगिकीकरण असलेला देश. तिथे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. क्युबाचे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे कारण त्याचा औद्योगिकीकरणाचा दर खूपच कमी असून ऊर्जास्रोत स्वच्छ आहेत. वातावरणातील बदलामुळे मुलांना पूर, उष्णतेची लाट, दुष्काळ अशा आपत्तींचा धोका तर वाढतोच; पण त्यांच्या आहारातील पोषक घटकही कमी होत आहेत. 'द स्टेट ऑफ द वर्ल्डस चिल्ड्रन' या अहवालानुसार हवामान-संबंधित आपत्ती, लोकसंख्येतील बदल आणि तंत्रज्ञानाच्या प्रवेशातील असमानता ही आजची मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे २०५० पर्यंत मुलांच्या जीवनात नाट्यमय बदल घडून अनेक मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात. जागतिक स्तरावर वाढणारे तापमान भविष्यात मोठा धोका निर्माण करु शकते.

२०२३ हे हवामान इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. यंदा जागतिक तापमानातील वाढ दीड अंश सेल्सिअसची लक्ष्मणरेषा ओलांडण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये हवामानाच्या वाढत्या धोक्यांचा परिणाम लहान मुलांवर अधिक गंभीरपणे होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. पूर्व आणि दक्षिण आशिया तसेच पॅसिफिक, मध्य पूर्व, उत्तर, पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील देशांमध्ये अतिउष्णतेचा सामना करणाऱ्या मुलांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ होऊ शकते, असे अहवालात म्हटले आहे. पुरामुळे पूर्व आफ्रिका आणि पॅसिफिक प्रदेशातील मुलांना सर्वात जास्त फटका बसण्याची शक्यता आहे. या संदर्भात 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल यांनी म्हटले आहे की मुलांना हवामान आपत्तींपासून ऑनलाइन धोक्यांपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे धोके काळाच्या ओघात अधिक गंभीर होतील. हवामानबदल आणि बालविवाह अशा दुहेरी संकटाचा सामना करणाऱ्या मुली, अजूनही योजनांपासून वंचित आहेत. त्यांच्या मते २०५० मध्ये चांगले भविष्य घडवण्यासाठी कल्पनेपेक्षा जास्त प्रयत्न करावे लागतील. या अहवालात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या नाट्यमय बदलांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. यानुसार पुढील २६ वर्षांमध्ये उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियामध्ये मुलांची लोकसंख्या सर्वाधिक असेल; मात्र त्याच वेळी वृद्धांची संख्याही वाढत आहे. असा अंदाज आहे की जगातील प्रत्येक प्रदेशातील लोकसंख्येतील मुलांचा वाटा कमी होऊ शकतो. आफ्रिकेत मुलांची संख्या सर्वाधिक असूनही ही लोकसंख्या ४० टक्क्यांच्या खाली पोहोचू शकते. २००० च्या दशकात लोकसंख्येतील हा हिस्सा सुमारे ५० टक्के होता. त्याचप्रमाणे, पूर्व आशियामध्ये २००० मध्ये असणारा २९ टक्के वाटा आता १७ टक्क्यांच्या खाली जाईल. पश्चिम युरोपमध्येही असेच काहीसे चित्र पहायला मिळेल. या बदलांमुळे जगासमोर नवी आव्हानेही निर्माण होतील. काही देशांमध्ये लहान मुलांसाठी सेवा विस्तारित करण्याचा ओढा वाढेल. त्याच वेळी, काही देश वृद्ध लोकांच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करत असतील. बदलत्या जगात मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही मुले उद्याचा पाया आहेत. त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत, तर त्यांचे भवितव्य टांगणीला लागेल.

आजकाल

राज्यातील द्राक्ष क्रांतीला लागली घरघर

राज्यात द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र साडेचार लाख एकर आहे. त्यापैकी सुमारे पन्नास हजार एकर क्षेत्रावरील द्राक्षबागा तोडून टाकण्यात आल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्याचा पूर्वभाग, शिराळा तालुका वगळता उर्वरित सांगली जिल्हा, सोलापूर, पुणे, धाराशिव, नाशिक, धुळे जिल्ह्यांत द्राक्षबागा आहेत. राज्यात द्राक्ष लागवडीखालील सर्वाधिक क्षेत्र सांगली आणि नाशिक जिल्ह्यांत आहे. त्याखालोखाल सोलापूर आणि पुणे जिल्ह्यात द्राक्षबागा आहेत. नाशिक वगळता राज्याच्या अन्य भागातून द्राक्ष निर्यात फारशी होत नाही. सोलापूर, पुणे आणि सांगलीच्या काही भागातून द्राक्ष निर्यात होते. पण, नाशिक वगळता अन्य जिल्ह्यांतील द्राक्षे देशांतर्गत बाजारात विकली जातात. सांगली, सोलापूर जिल्ह्यांत बेदाणा निर्मिती मोठ्या प्रमाणावर होते. तासगाव येथील बेदाण्याला जीआय मानांकन मिळाले असून, तासगावचा बेदाणा जगप्रसिद्ध आहे. तर नाशिकच्या द्राक्षांना जगाची बाजारपेठ काबीज केली.

भारतात महाराष्ट्र द्राक्ष लागवड आणि उत्पादनात आघाडीवर आहे. राज्यात प्रामुख्याने नाशिक, सांगली, पुणे, सोलापूर, सातारा, नगर, धुळे आणि धाराशिव जिल्ह्यांत द्राक्ष उत्पादन होते. महाराष्ट्रासह काही प्रमाणात कर्नाटक (महाराष्ट्र सीमाभाग), तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात द्राक्ष शेती होते. अगदी लेह लडाखमध्येही स्थानिक, देशी द्राक्षवेली आहेत. सप्टेंबर महिन्यात (अनंत चतुर्दशीच्या सुमारास) द्राक्षे काढणीला येतात. पण महाराष्ट्र वगळता अन्य राज्यातील उत्पादनही नगण्य आहे. देशातून होणारी द्राक्ष आणि बेदाणा निर्यात प्रामुख्याने महाराष्ट्रातूनच होते. जागतिक पातळीवर विचार करता द्राक्ष उत्पादनात भारताचा सातवा क्रमांक लागतो. चीन १२० लाख टनांसह पहिल्या क्रमांकावर असून, त्या खालोखाल इटली, फ्रान्स, अमेरिका, तुर्कीयेनंतर भारताचा क्रमांक लागतो. भारतात सरासरी ३० ते ४० लाख टन द्राक्ष उत्पादन होते, त्यात महाराष्ट्राचा वाटा ९५ टक्क्यांपर्यंत आहे. राज्यातील द्राक्ष लागवडीखालील क्षेत्र सुमारे साडेचार लाख एकर होते, त्यात घट होऊन चार लाख एकरपर्यंत खाली आले आहे.

द्राक्षबागांसाठी मुरमाड आणि पाण्याचा निचरा होणारी जमीन लागते. पाणी कमी पण, वेळेवर लागते. अलिकडे सर्वच द्राक्षबागांना ठिबक सिंचनाद्वारे पाणी दिले जात असल्यामुळे कमी पाण्यावरही द्राक्ष पीक घेतले जात होते. द्राक्षबागांना पहिला फटका बसला नोटबंदीचा. नोटाबंदीत द्राक्षे मातीमोल झाली. दरात मोठी घसरण झाली. नोटाबंदीपूर्वी मिळत असलेला दर २०२३ मध्येही मिळाला नाही. नोटाबंदीनंतर करोना टाळेबंदीचा सामना द्राक्ष शेतीला करावा लागला. करोना टाळेबंदीत मागणी अभावी द्राक्षे शेतातच पडून राहिली. त्यानंतर सतत द्राक्षांना मागणी घटत गेली, शिवाय दरातही पडझड होत राहिली. करोना आणि नोटाबंदीनंतर इंधन, मजुरीचा दर वाढत गेला. रासायनिक खते, औषधांच्या दरातही वाढ झाली. शेतीसाठी लागणाऱ्या सर्व औषधांवर, अवजारांवर जीएसटी आकारला जातो. इंधन, मजुरी, औषधांच्या दरात जितकी वाढ झाली, त्या तुलनेत द्राक्षांना वाढीव दर मिळाला नाहीच. उलट दर कमी मिळू लागल्यामुळे द्राक्ष बागायतदार शेतकरी अडचणीत आला. द्राक्ष शेतीसाठी मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागते. सातत्याने होत असलेल्या तोट्यामुळे ही आर्थिक गुंतवणूक अडचणीत आली. कर्जबारीपणा वाढू लागला. त्यामुळे शेतकऱ्यांनी द्राक्षबागा काढून कमी काळातील आणि कमी आर्थिक गुंतवणुकीच्या भाजीपाला, फळभाज्या, फुलशेतीला प्राधान्य दिले.

द्राक्ष पिकाला अति थंडी, अति उष्णता, अति पाणी चालत नाही. नेमके याच्या विपरीत स्थिती गत तीन वर्षांपासून आहे. तीन वर्षे वर्षभर सलग पाऊस पडतो आहे. जून अखेरीस सुरू झालेला पाऊस नोव्हेंबर अखेरपर्यंत होत आहे. याशिवाय उन्हाळी, अवकाळी आणि वादळी वाऱ्यांसह पडणारा पाऊस वेगळाच. त्यात गारपिटीची, अति थंडीची आणि उन्हाळ्यात अति तापमानाची स्थिती असे द्राक्ष शेतीला एकूण प्रतिकूल हवामान राहिले आहे. अति पाण्यामुळे द्राक्ष वेलीला अपेक्षित घड लागत नाहीत. मुळे कुजतात, घड पिवळे पडून जिरून जातात. काढणीच्या वेळी हलका पाऊस झाला तरीही द्राक्षाचे नुकसान होते. फळकुज होते, द्राक्षे सडतात. काढणीच्या वेळी वादळी वारे आल्यास द्राक्षबागा उन्मळून पडतात. गारपीट झाल्यास संपूर्ण पीक मातीमोल होऊन जाते. एकूणच नैसर्गिक आपत्तींमुळे द्राक्ष बागांचे कंबरडे मोडले आहे. द्राक्षबागांचे क्षेत्र कमी होण्यामागील मुख्य कारण नैसर्गिक आपत्ती हेच आहे.

थॉमसन सिडलेसपासून तयार करण्यात आलेल्या सुधारित वाणांची म्हणजे लांब द्राक्षे सोनाक्का, माणिकचमन, सुपर सोनाक्का, अनुष्का सारख्या जातींच्या वाणाला घड लागण्याची क्षमता कमी झाली आहे. निर्यातीसाठी प्रसिद्ध असलेल्या नाशिकमध्येही द्राक्ष क्षेत्रात वेगाने घट होत आहे. आयात केलेल्या आणि पेटंट असलेल्या वाणाची लागवड वाढली आहे. पेटंट वाणाच्या रोपांसाठी, उत्पादित होणाऱ्या द्राक्षांवर पेटंटचा कर द्यावा लागतो. अशी काही पेटंटेड वाणे, जातींची लागवड नाशिकमध्ये वेगाने वाढू लागली आहे. दुसरीकडे बेदाणा निर्मितीसाठी प्रसिद्ध असलेल्या तासगावमध्येही गेली कित्येक वर्षे दर्जेदार बेदाण्याचा दर सरासरी २०० रुपये किलोच्या वर गेलेला नाही. त्यामुळे बेदाणा निर्मितीतही हळहळू घट होत आहे. सध्या खास बेदाणा निर्मितीसाठीची द्राक्ष लागवड कमी झाली आहे. बाजारात न विकली गेलेली किंवा मागणी नसल्यामुळे अनेक लांब वाणांच्या द्राक्षांपासून बेदाणा निर्मिती होत आहे. त्यामुळे बेदाणा उत्पादनाचे आकडे चांगले दिसत असले तरीही दर्जेदार बेदाणा उत्पादन घटत चालले आहे. **(साभार)**

मराठी साहित्यिक दिनविशेष

२० डिसेंबर

१८८२ :- केशवसुतांचे शिष्य, कवी नरहर शंकर रहाळकर यांचा जन्म. आपल्या गुरुवरील लेखांचे 'केशवसुत आणि त्यांच्या कविता' कविता' या नावाने पुस्तक रुपाने प्रकाशित. 'पुष्पांजली', 'बिल्वदल' मिळून पाच काव्यसंग्रह. 'माझी आई आणि माझ्या आईची तसबीर' ही विलापिका. 'मानाजीराव' हे नाटक आणि 'शांकुतलसौंदर्य' ही टीकात्मक निबंध अशी साहित्य संपदा. **१९०६ :-** लेखक, पत्रकार चंद्रकांत विष्णू बावडेकर यांचा जन्म. 'आपले अन्न', 'पाच वर्षाचा पाळणा', 'लाल किल्ला', 'विसाव्या शतकातील अमेरिकेमधला धर्म', 'सरहद्दीवरील साहसे' इत्यादी पुस्तके लिहिली. **१९०६ :-** निबंधकार, पत्रकार आणि ज्ञानदीप या मासिकांचे संस्थापक सदाशिव पांडुरंग केळकर यांचे निधन. 'मूर्तीपूजा आवश्यक आहे काय?', 'ग्रंथप्रामाण्य' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध. **१९२१ :-** नियतकालिके आणि वृत्तपत्रातून सातत्याने लेखन करणारे लेखक, बालसाहित्यिक विनायक भावडू नेमाडे यांचा जन्म. 'अजब जादूगार', 'फुलपंख राजकन्या', 'सुगंधी राजकन्या' या बालकथासंग्रहासह 'आकाशतंत्री', 'चिनगीरी', 'स्वप्नगंधा' हे काव्यसंग्रह, 'दुधारा झरा' ही कादंबरीका 'धुक्याचा पडदा' ही नाटिका अशी साहित्य संपदा. १९२९. स्त्रीशिक्षण आरोग्य आदी विषयांचे लेखक गोपाल महादेव चिपलणकर यांचे निधन 'स्त्रीजीवनावर प्रकाश', 'सार्वजनिक शिक्षण व मोफत वाचनालये', 'शुध्दलेखनाचा राजमार्ग' इत्यादी पुस्तके प्रकाशित. **१९३२:-** भाषांतरकार विष्णू वामन बापट यांचे निधन. त्यांच्या नावावर ७० भाषांतरीत ग्रंथ आहेत. त्यामध्ये 'शंकराचार्यकृत आत्मबोध आणि अपरोक्षानुभूती' या ग्रंथांचा अनुवाद उल्लेखनीय आहे. तसेच 'ब्रम्हविद्या ग्रंथरत्नमाला' हे मासिक, 'आचार्य' हे पाक्षिक या सारखी नियतकालिके चालवली. **१९४७ : -** मातृभाषा हिंदी असूनही मराठीतून काव्य, नाटय आणि दिग्दर्शन करणारे प्रा. चंद्रभूषण उमाशंकर कुलश्रेष्ठ यांचा जन्म. ह्यांचा 'आत्मे घ्या आत्मे' हा काव्यसंग्रह, 'कादंबरीच्या शोधात ही कादंबरीका', 'गहाण टाकलेली जखम', 'सोलापूरची पाणीपुरी' या पुस्तकातून सोलापुरातील वातावरणातील विनोदी घटनांचे चित्रण केले आहे. **१९५० : -** लेखक श्रीकांत रघुनाथ कोराभे यांचा जन्म, ह्यांच्या साहित्यसंपदेत 'वऱ्हाडी बंडीउलार', 'काफला' आणि 'कारवा' गजलसंग्रहात गजल समाविष्ट. **१९५२ :-** कवी प्रा. गिरीष गोपाळ देशपांडे यांचा जन्म. त्यांचा 'स्वातंत्र्याचे मृत्यूपत्र' हा काव्यसंग्रह इंदिरा गांधीनी लादलेल्या आणीबाणीच्या पार्श्वभुमीवर बेतलेला आहे. तसेच 'लिटमस' हा आणखी एक काव्यसंग्रह त्यांच्या नावावर आहे. **१९६४ : -** लेखक डॉ. शिरीष बाळकृष्ण उन्हेकर यांचा जन्म ह्यांनी मराठी व इंग्रजीतून 'आर्य चाणक्य', 'राणी लक्ष्मीबाई', 'लो. टिळक', 'पं. नेहरु', 'स्वा. सावरकर', 'डॉ. कलाम', 'डॉ. होमी भाभा', 'न्यूटन', 'गॅलिलिओ', 'डार्विन' आणि लिहिलीत. 'महात्म' आदींची चरित्रे **१९६७:-**दिनमित्र पत्राचे संपादक आणि ज्योतिराव फुले यांचे सहकारी कृष्णराव भालेकर यांचे पुत्र मकंद गणपत पाटील यांचे निधन गणपतराव पाटील यांनी त्यांना दत्तक घेतले. त्यांचे आसुडाचे फटके हे सदर त्याकाळी अतिशय गाजले. मुकुंदरावांचे कुळकर्णी लीलामृत हे विडंबनकाव्य त्यातील भेदक उपासामुळे वादग्रस्त ठरले. याशिवाय हिंदू आणि ब्राह्मण हे संवादात्मक वर्णव्यवस्थेवर टीका करणारे पुस्तक त्यांनी लिहिले. विधवाविवाहसंबंधित कादंबरी त्यांनी लिहिली. सत्यशोधक पत्रकार ही मुकुंदरांची ओळख त्या काळात होती.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० डिसेंबर

१) श्रीम.मालती मधुकर हातणकर रामनाथ अलिबाग, २०-१२-१९५०
२) श्रीम.प्रकाश रामभाऊ गणतांडेल अलिबाग, २०-१२-१९४९
३) श्री. मधुकर चांगु पाटील खिडकी, अलिबाग, २०-१२-१९३५
४) श्री. आनंद पांडुरंग नारे चेंढरे, अलिबाग २०-१२-१९५३
५) सौ. संगीता कमळाकर वेंगुर्लेकर वाडगाव, अलिबाग, २०-१२-१९५२

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

सई नरेश दळवी, वाढदिवस अलिबाग

भाजपची मस्ती मोडण्याची वेळ आली

उद्धव ठाकरे यांचा भाजपवर हल्ला

। मुंबई । प्रतिनिधी ।

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भरसंसदेत घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल हिणकस वक्तव्य करून त्यांचा अपमान केला आहे. त्याबद्दल अमित शहा यांच्यावर तातडीने कारवाई करा, नाहीतर सत्ता सोडा, अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. महाराष्ट्रात महायुतीला राक्षसी बहुमत मिळालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्राला कसेही वाकवा, कसेही झोडा, महाराष्ट्राच्या दैवताचा कुणीही अपमान करा, महाराष्ट्र काहीच करू शकत नाही, अशा मस्तीत भाजप वागायला लागला आहे. ही मस्ती मोडण्याची आता वेळ आली आहे, असेही उद्धव ठाकरे यांनी ठणकावले आहे.



आंबेडकर ही तर आता फॅशनच झाली आहे, त्यापेक्षा देवाचे नाव घेतलात तर सात जन्म स्वर्गप्राप्ती होईल, असे अवमानकारक वक्तव्य अमित शहा यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात केले होते. त्यानंतर देशभरात शहा आणि भाजपविरुद्ध संतापाची लाट उसळली आहे. अमित शहा यांचा तीव्र निषेध केला जात आहे. उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री' निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधताना अमित शहा आणि त्यांची पाठराखण करणाऱ्या भाजपचा चांगलाच समाचार घेतला आहे.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, भाजपा आणि संघानेही आता खुलासा केला पाहिजे की त्यांनी हे अमित शहांकडून बोलवून घेतलेय का? अदानींचे नाव घेतल्यानंतर आभाळ कोसळावे तसा भाजपा विरोधकांवर कोसळून पडतो. आता बाबासाहेबांचा उल्लेख असा केल्यानंतर भाजपा अमित शहांवर काही कारवाई करणार आहे का? नसेल तर भाजपच्या हृदयामधील काळे आता उघड झाले आहे, असे म्हणत, आतातरी महाराष्ट्र आणि देशाने शहाणे झाले पाहिजे, असा सल्ला उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

भाजपाचे ढोंग जनते समोर आले

अमित शहा यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकर यांचा अत्यंत हिणकस व उद्दाम उल्लेख अमित शहा यांनी केला आहे. हा उद्दामपणा आहे. भाजपाचा बुरखा फाटून त्यांचे ढोंग आता समोर आले आहे. भाजपाचे हिंदुत्व म्हणजे 'मुंह में राम आणि बगल में छुरी' असे आहे. त्यांना महाराष्ट्र संपवायचा आहे. आपल्यापूर्वी जन्माला कुणी आलेच नाहीत असे त्यांना दाखवायचे आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

भाजपाच पुसून जाईल

बाबासाहेब आंबेडकर केवळ एका पक्षाचे नव्हते. प्रबोधनकार आणि त्यांचे ऋणानुबंध होते. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेही म्हणायचे की, महाराष्ट्राने देशाला दोन दैवते दिली आहेत. एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. महाराजांचा भाजपाने अपमान केला आणि आता आंबेडकरांचे नाव पुसायला निघाले आहेत. पण याद राखा, भाजपावाले पुसले जातील, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गाच्या खवटी ते परशुराम घाट या ४४ किलोमीटर अंतराच्या चौपदरीकरणात तब्बल १००हून अधिक ठिकाणी काँक्रिटीकरण रस्त्याला तडे गेले आहेत. याबाबत भरणे येथील सामाजिक कार्यकर्ते रूपेश पवार यांनी राष्ट्रीय महामार्ग अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देत चौपदरीकरणातील चुकीच्या कामाच्या चौकशीची मागणी केली आहे. खवटीपासून परशुराम दरम्यानच्या चौपदरीकरणाचे काम कल्याण टोलवेज कंपनीने केले असून, अनेक ठिकाणी निकृष्ट काम झाल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे.

दरम्यान, यावर्षीच्या पावसाळ्यात महामार्गावरील भरणे-वेरळ रस्त्यालगतची संरक्षक भिंत एक ते दीड फेट सरकली आहे, असा आरोपही पवार यांनी केला आहे. जगबुडी नदीवरील पुलावरून वाहतूक सुरू होताच काही महिन्यातच मध्यभागी खड्डा पडल्याने वाहनांना ब्रेक लावण्यात आला. या ठिकाणी गर्डर बसवून तात्पुरती मलमपट्टी करण्यापलीकडे काहीच केलेले नाही. त्याचबरोबर महामार्गावरील भोस्ते घाटातील मुख्य वळणदार रस्त्यावर एका बाजूला उंच डोंगर असून, दुसऱ्या बाजूस सिमेंट काँक्रिटची भिंत उभारली आहे. हे कामही निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

एकनाथ शिंदेंचे फर्मान अंगलट

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुख्यमंत्री असो किंवा उपमुख्यमंत्री आम्हाला त्याच्याशी काहीही घेणेदेणे नाही, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने बुधवारी (दि.१८) शिंदेंचे चांगलेच वाभाडे काढले आहेत. माझ्या होर्डिंग्स, बॅनरला हात लावू नका, असे एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री झाल्यावर मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांना बजावले होते. हे फर्मान एकनाथ शिंदे यांच्या अंगलट आले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या फर्मानचे एका इंग्रजी दैनिकाने वृत्त दिले होते. त्याची प्रत प्रतिज्ञापत्रावर सादर करत सामाजिक कार्यकर्ते जोरू बथेना यांनी ही बाब मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाच्या निदर्शनास आणली होती. या प्रतिज्ञापत्राची प्रत राज्य शासन व मुंबई पालिकेला देण्यात आली आहे. त्याचे उत्तर दिले गेले नाही, असे ॲड. मनोज शिरसाट यांनी न्यायालयासमोर स्पष्ट केले आहे. तसेच, माझ्या होर्डिंग्स, बॅनरवर कारवाई केली जात आहे. यापुढे माझ्या कोणत्याच होर्डिंग्स, बॅनरवर कारवाई करू नका, असे सर्व अतिरिक्त पालिका आयुक्तांना मुख्यमंत्र्यांकडून सांगण्यात आले होते, अशी माहिती ॲड. शिरसाट यांनी न्यायालयाला दिली आहे. यावर आम्हाला त्याच्याशी काहीही घेणेदेणे नाही. असे घडले असेल तर त्याचा खुलासा व्हायला हवा. महाधिवक्त्यांनी यासाठी गुरुवारी हजर रहावे, असे आदेश देत खंडपीठाने ही सुनावणी तहकूब केली होती.

मविआकडून विधानभवन परिसरात आंदोलन

। नागपूर । प्रतिनिधी ।

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद नागपूरमध्ये विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात उमटले आहेत. विरोधी पक्षांनी संविधान चौकात आणि विधानभवन परिसरात अमित शहांच्या वक्तव्याचा निषेध केला. शिवसेना (उद्धव ठाकरे) आ. आदित्य ठाकरे, विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह शिवसेनेच्या आमदारांनी आंदोलन केले.

केंद्रीय गृहमंत्री यांनी संसदेत केलेल्या भाषणात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार घालून व अभिवादन करून मविआच्या आमदारांनी आक्रमकपणे आंदोलन केले. हातात बाबासाहेबांचे फोटो घेऊन आणि घोषणा देत सर्व आमदारांनी संविधान चौकापासून पायी चालत विधानभवनात प्रवेश केला. यावेळी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आ. आदित्य ठाकरे म्हणाले की, भाजपकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान झाला आहे. हा त्यांचाच नव्हे तर संविधान आणि जनतेचा देखील अपमान आहे. बाबासाहेबांनी सर्व समाज घटकातील लोकांना न्याय दिला आहे. जसे आम्हाला वाटते अपमान झालाय तसे नितीश कुमार, रामदास आठवले आणि सत्तेतील मित्र पक्षांना वाटत नाही का? वाटत असेल तर त्यांनी आंदोलन केले पाहिजे, रस्त्यावर उतरले पाहिजे. भाजपच्या मनातले ओठावर आले आहे, अशी टीका आ. आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

खातेवाटपावरून महायुतीत भांडणं

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले की, मंत्रीमंडळाचा विस्तार होऊन चार दिवस झाले. हिवाळी अधिवेशन सुरू होऊन चार दिवस झाले. तरिही अद्याप मंत्र्यांना खातेवाटप झालेले नाही. लोकांचे प्रश्न कुणासमोर मांडाचे हे आमदारांना समजत नाही. ज्यांनी ज्यांनी शपथ घेतल्या आहेत त्यांच्यात किती स्वार्थ आहे. आनंदाने लोकांची सेवा करण्याऐवजी ते खातेवाटपावरून भांडण्यात व्यस्त आहेत. हा निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालाचा अपमान आहे.

लंपट विस्तार अधिकाऱ्याचे निलंबन

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

महिला शिक्षिकांच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे असभ्य शब्द वापरणाऱ्या विस्तार अधिकाऱ्याला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मोठा दणका दिला आहे. २४ तासांत या अधिकाऱ्याचे निलंबन करा, तसेच त्या अधिकाऱ्याला पाठीशी घालणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण अधिकाऱ्यांसह जिल्हा परिषदेतील त्या अधिकाऱ्याच्या मत्राचीदेखील चौकशी करण्याचे आदेश रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत. 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमातून ही जनसुनावणी केली आहे.

'अजित पवार यांनीच वगळले'

। नाशिक । प्रतिनिधी ।

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच आपल्याला मंत्रिमंडळातून वगळले. त्यांनी कोणाचेच ऐकले नाही. दुसऱ्या कोणाला दोष देण्यात अर्थ नाही, असा थेट हल्ला माजी मंत्री छगन भुजबळ यांनी अजित पवार यांच्यावर चढवला आहे. तसेच, योग्यवेळी विचारपूर्वक निर्णय घेईन, तेव्हा भक्कम साथ द्या, असे आवाहन त्यांनी ओबीसी बांधवांना केले आहे.

यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले की, मला जर आता राज्यसभेवर पाठवायचे होते, तर येवल्यातून उभे करायचेच नव्हते. माझा मंत्रिमंडळात समावेश असावा, असा आग्रह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्वांचाच होता. अजित पवार यांनी कोणाचेही ऐकले नाही, मला मंत्रिमंडळातून वगळले. इतर कोणालाही दोष देण्यात अर्थ नाही. निर्णय प्रक्रियेत विश्वासात न घेता 'घरकी मुर्गी दाल बराबर' अशी अवस्था माझी केली आहे.

पुढे ते म्हणाले की, एकट्या 'लाडकी बहिणी'मुळे महायुतीला बहुमत मिळाल्याचा काहींचा भ्रम आहे. छगन भुजबळ यांचे आता काही नाही, असे त्यांना वाटत असेल. परंतु, या यशात ओबीसींचा वाटा आहे. बहुमताने सरकार येऊनही अशी अवहेलना का, याचे शल्य असल्याचे भुजबळ म्हणाले.

विरोधी पक्षाचा आवाज चेपण्याचा प्रयत्न

अनिल परब तालिका सभापतींवर संतापले

। नागपूर । प्रतिनिधी ।

राज्यपालांच्या अभिभाषणावर बुधवारी (दि.१८) विधान परिषदेत चर्चा झाली. यावेळी राष्ट्रवादीच्या एकनाथ खडसे यांचे भाषण दहाव्या मिनिटाला थांबवले गेले. त्यावरून खडसे यांनी आक्षेप घेत म्हणाले की, तुमची-माझी काय दुश्मनी आहे, माझ्याच भाषणासाठी तुमच्याकडे वेळ कमी असतो का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. माझे भाषण किती वाजता सुरू झाले ती वेळ सांगा, अशी मागणी देखील त्यांनी केली.

यावेळी तालिका सभापतींनी खडसे यांना त्यांचे भाषण ११.२७ वाजता सुरू झाल्याने आपण दहा मिनिटांनी ११.३७ वाजता बेल वाचवून थांबण्यास सांगितले, असे उत्तर दिले. त्यावर सत्ताधारी पक्षातील प्रवीण दरेकर यांना २२

मिनिटे दिली गेली, अतुल सावे १५ मिनिटे बोलल्याची आठवण खडसेंनी करून देत तुमचा माझ्यावर आकस आहे का, असा सवाल त्यांनी केला. त्यावर मंत्री शंभुराज देसाई यांनी आकस या शब्दाला आक्षेप घेतला.

यावेळी खडसे यांना दाबले जात असल्याचे लक्षात येताच शिवसेना (उद्धव ठाकरे) गटनेते अनिल परब यांनी उभे राहून तालिका सभापतींनाच विचारले की, कोणी किती बोलायचे ही वेळ कुणी निश्चित केली, तसा काही नियम आहे का, असेल तर मला पुस्तकात दाखवा. विरोधी सदस्य ऐकून घेतात म्हणून चेपता का, असा संतापही त्यांनी व्यक्त केला आहे. यावर तटकरे यांनी नियम ६२ वाचून दाखवला. तसेच, सभागृहाचे मत घेऊन सदस्यांच्या भाषणाची वेळ सभापती वाढवू शकतात, असे त्यात नमूद होते. त्यावरच बोट ठेवत अनिल परब यांनी सभापती आणि शंभुराज देसाई यांना कचाट्यात पकडले. सभागृहाचे मत घेतले का मग, असे त्यांनी विचारताच शंभुराज निरुत्तर झाले, तर तालिका सभापतींनी काल झालेल्या बैठकीतच चर्चेची वेळ निश्चित करण्यात आली होती, असे सांगितले.

महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर?

विजय वडेट्टीवार यांचा सवाल

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्यपालांच्या अभिभाषणात महायुती सरकारच्या कामकाजाबाबत अनेक मोठे दावे करण्यात आले आहेत. परंतु, राज्यातील आर्थिक स्थिती पाहता ते फोल ठरण्याची शक्यता आहे. राज्य दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर आहे का, असा सवाल काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत उपस्थित केला आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार अशी घोषणा महायुतीने जाहीरनाम्यात केली होती, अजूनही सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी कधी देणार हे सांगितलेले नाही. राज्यातील लाडकी बहीण योजनेतील महिलांना २ हजार १०० रुपये देणार असे आश्वासन दिले आहे, परंतु, अजूनही त्यांच्या अंमलबजावणीबाबत चित्र स्पष्ट नाही.

एकीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत २८ टक्के वाढ झाली आहे, सामान्यांचे घरचे बजेट कोलमडले आहे, अशी टीकाही यावेळी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

ग्रामस्थांचे जिंदालच्या गेटवर आंदोलन

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

काही दिवसांपूर्वी जिंदाल कंपनीचे मोठ्या प्रमाणावर वायू गळती झाल्याने १२५ पेक्षाही अधिक विद्यार्थी व ग्रामस्थांना हॉस्पिटलमध्ये दाखल व्हावे लागले होते. यामुळे जिंदालवरुन प्रचंड जनक्षोभ निर्माण झाला आहे. दरम्यान, परिसरातील संतप्त ग्रामस्थांनी गुरूवारी (दि.१९) दुपारपासून जिंदालच्या गेटवर जमा होण्यास सुरूवात केली होती. यावेळी शेकडोंचा जमाव जमा झाला आणि 'जिंदाल कंपनी बंद करा' अशा घोषणा सुरु झाल्या. यावेळी, जिंदालच्या अधिकारी यांनी त्वरित पोलिसांना पाचारण केले आणि पोलीसांचा मोठा

फौजफाटा दाखल झाला. यावेळी, संतप्त ग्रामस्थ गेट तोडून कंपनीच्या आवारात जाऊ पहात होते. परंतु, त्यांना गेट बाहेरच अडवून परतविण्यात आले.

जिंदाल कंपनी सुरु होताना रत्नागिरीत 'जनसुनावणी' झाली होती. त्यावेळी 'रत्नागिरी बचाव संघर्ष समिती'चे नेते व मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. त्यावेळी या प्रकल्पामुळे जयगडच्या समुद्रातील मत्स्य जीवन तसेच वनस्पती जीवन, प्राणी जीवन, शेती, बागायती, पर्यावरण व जनजीवन यावर कोणते विपरीत परिणाम होतील ते आधी सांगा आणि मगच परवानगीचे बोला, असे संघर्ष समितीच्या मंडळींनी सुनावले होते. त्यानंतर जिंदालने जयगडच्या गावाबाहेरील पठारावर गाजावाजा न करता जनसुनावणी आयोजित केली आणि आपल्याला हवे तसे करुन घेतले होते. यातच काही दिवसांपूर्वी झालेल्या वायुगळतीमुळे सुमारे १२५ पेक्षाही अधिक विद्यार्थी व ग्रामस्थ हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते. तरी देखील पुढारी मूग गिळून घरी बसले आहेत. याचा राग धरून संतप्त ग्रामस्थ एकवटले होते.

'परभणीतील घटना कलंक लावणारी'

। मुंबई । प्रतिनिधी ।

परभणी व बीड जिल्ह्यात झालेल्या घटना या पुरोगामी महाराष्ट्राला व संताच्या भूमीला कलंक लावणाऱ्या आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचार संपवण्याचा हा प्रयत्न आहे. परभणीत पोलिसांच्या मारहाणीत सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला मृत्यू हा पोलिसांनी केलेली हत्या असून या हत्येप्रकरणी जबाबदार पोलिसांवर अद्याप कठोर कारवाई का केली नाही? राजकीय आशिर्वादाने महाराष्ट्रात सुरु असलेल्या गुंडाराजचा कायमचा बिमोड करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



विधानसभेत परभणी व बीड जिल्ह्यातील घटनांवरील चर्चेत बोलताना नाना पटोले यांनी सरकारचे वाभाडे काढले. ते पुढे म्हणाले की, परभणीची घटना ही भीमा कोरगाव सारखीच आहे. घटना घडल्याच्या दुसऱ्या दिवशी शेकडो लोक रस्त्यावर जमा झाले, दुकाने बंद झाली. पोलिसांनी घटना झाली त्यावेळीच योग्य ती कारवाई केली असती तर पुढील घटना घडल्या नसत्या. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करुन निरपराध लोकांवर लाठीचार्ज केला, जनावरापेक्षाही वाईट पद्धतीने मारहाण केली. पोलिसांना लाठीचार्जचे आदेश कोणी दिले? परभणीतील घटना सरकार प्रायोजित होती का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. महाराष्ट्रात फोफावलेल्या या गुंडाराजचा आता अंत झाला पाहिजे आणि महाराष्ट्रात शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार कायम राहिला पाहिजे, असे नाना पटोले म्हणाले.

राजापूरमध्ये नव्याने सापडले कातळशिल्पे

मानवाच्या हजारो वर्षांपूर्वीच्या पाऊलखुणा

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

राजापूर तालुक्यातील खरवते येथील सड्यावर मानवी देहाची ठेवण असलेली आणि हाती तलवार घेऊन योद्धयाची वेशभूषा परिधान केलेली मानवी आकृती आणि मानवी हाताचा पंजा, अशी दोन कातळशिल्पे सापडली आहेत. ती सड्यावरील जांभ्या दगडाच्या कातळात कोरलेली आहेत. त्यामुळे खरवतेच्या सडा परिसरातील मानवाच्या हजारो वर्षांपूर्वीच्या वास्तव्याच्या पाऊलखुणा दृष्टिक्षेपात आल्या आहेत.

राजापूर तालुक्यातील बारसु, देवाचेगोठणे, देवीहसोळ, आदी भागांतील सड्यावर मानवाच्या हजारो वर्षांपूर्वीच्या वास्तव्याच्या पाऊलखुणा सांगणारी वैशिष्ट्यपूर्ण कातळशिल्पे गेल्या काही वर्षात आढळली होती. त्यानंतर खरवतेत प्रथमच दिसलेल्या या कातळशिल्पांमुळे पुन्हा एकदा राजापूरचे नाव देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचणार आहे.

निसर्गयात्री संस्थाप्रमुख, कातळशिल्प संशोधक सुधीर रिसबूड, धनंजय मराठे आणि

खरवते येथील ज्येष्ठ ग्रामस्थ गंगाराम चौगुले यांनी दिलेल्या माहितीनुसार, सरपंच अभय चौगुले, उपसरपंच गौरव सोरप, सदस्य किशोर चौगुले, संतोष चौगुले, जान्हवी माटल, सत्यवती बावकर, वैशाली चौगुले, ग्राशपंचायत नेहाकुडाळी, ग्राशपंचायत देवीदास उबाळे, संजय आटल, केंद्रचालक भक्तो माटल, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षक चैत्रा गुरव, पर्यावरणप्रेमी प्रशांत चौगुले या टीमने या कातळशिल्पांचा शोध घेण्यासाठी मोहीम राबवली होती. माझी वसुंधरा अभियानांतर्गत या कातळशिल्पांसह सड्यावरील जैवविविधतेचे जतन आणि संवर्धन केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. या कातळशिल्पातून येथील पर्यटनाला संधी उपलब्ध होणार असल्याचे बोलले जात आहे.

असे आहे कातळशिल्प..

खरवतेच्या सड्यावरील त्या कातळशिल्पांमध्ये मानवी देहाची ठेवण असलेल्या मानवाकृतीचे कातळशिल्प ७ फूट लांब आणि ४ फूट रूंदीच्या आकाराचे आहे. तसेच, मानवी हाताचा पंजा १ फूट लांब आणि अर्धा फूट रुंद आकाराचा आहे.

"राजापूर पंचायत समितीने आयोजित केलेल्या पर्यटन विकास सभेत खरवते येथे कातळशिल्प असल्याची माहिती पुढे आली होती. त्यानुसार सरपंच अभय चौगुले, उपसरपंच गौरव सोरप अन्य ग्रामपंचायत पदाधिकारी आणि पर्यावरणदूतांच्या सहकार्याने शोध घेण्यात आला. माझी वसुंधरा अभियानांतर्गत कातळशिल्पांसह जैवविविधतेचे जतन आणि संवर्धन केले जात आहे.
-नेहा कुडाळी, ग्रामपंचायत अधिकारी"

अनुदानावर मिळणार पिंक ई-रिक्षा

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

महिला व बालविकास विभागातर्फे शहर आणि ग्रामीण भागातील गरजू महिलांना अनुदानावर पिंक ई-रिक्षा देण्यात येणार आहे. या योजनेत राज्य शासनाकडून २० टक्के अनुदान मिळणार आहे. तसेच, ६०० महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन महिला व बालविकास विभागातर्फे केले आहे.

पिंक ई-रिक्षा योजनेतून महिला व मुलींच्या रोजगारनिर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, स्त्री सशक्तीकरणास चालना देणे, महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करण्यासाठी नोकरी, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसाहाय्य व चालविण्यासाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करून देणार आहेत. यासाठी अर्जदाराचे वय २० ते ४० वर्षे, लाभार्थींचे कुटुंब महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयपिक्षा जास्त नसावे.

संक्षिप्त

एटीएम कार्डची प्रतीक्षा

आगरदांडा : मुरूड पोस्ट ऑफिस तर्फे ग्राहकांना वितरित केलेली एटीएम कार्डची मुदत ऑगस्ट २०२४ मध्ये संपली आहे. साडेतीन महिने उलटून गेले तरी ग्राहकांना अद्याप नवीन एटीएम कार्ड न मिळाल्याने पोस्ट कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन पैसे काढावे लागल्याने सर्वांचीच अडचण होत आहे. मुरूड पोस्ट ऑफिसमध्ये याविषयी विचारले असता विभागीय कार्यालयाकडे मागणी नोंदविले असल्याचे सांगितले. अलिबाग पोस्ट मास्तरांशी संपर्क साधला असता त्यांनी ग्राहकांच्या गैरसोयीबद्दल दिलगीरी व्यक्त केली.

डस्टबिनचे वाटप

हमरापुर : रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण विभागाच्या वतीने पर्यावरण संरक्षण उपक्रम सामाजिक उपक्रम व पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी डस्टनबीनचे वाटप पर्यावरण विभाग अध्यक्ष राजीव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पेण तालुक्यातील हमरापुर विभागात जोहे, तांबडशेत, डावरे या गावांमध्ये दत्त मंदिरा मध्ये डस्टबिन वाटप उपक्रम घेण्यात आला. तसेच प्राथमिक शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

मोफत आरोग्य तपासणी

रसायनी : मोहोपाडा येथील अष्टविनायक हॉस्पिटलात शनिवारी (दि.२१) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ञ डॉक्टर उपस्थित राहून रुग्णांना मार्गदर्शन करणार आहेत. या शिबीरात रँडम ब्लड शुगर, सीबीसी, रक्तदाब, ईसीजी,एक्स- रे,ऑडिओमेट्री, बीएमआय, डोळ्यांची तपासणी आदी मोफत तपासण्या करण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी रुपेश यादव ९८३३१०४४८७ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना सायकल वाटप

श्रीवर्धन : गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय श्रीवर्धन येथे सायकल वाटपाचा कार्यक्रम पार पडला. जितेंद्र सातनाक, प्रवीता माने, मुरकर, अनिकेत पवार, सबा, उपप्राचार्य प्राध्यापक किशोर लहारे यांच्या हस्ते महाविद्यालयातील १८६ आणि न्यू इंग्लिश स्कूल आराठीच्या विद्यार्थ्यांना २८ सायकलींचे वाटप करण्यात आले. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी दोन बस थांबा, शैक्षणिक साहित्याचे वाटप आदी प्रकल्प त्यांनी हाती घेतले.

पाच जणांवर ॲट्रॉसिटी गुन्हा

माणगांव : मागासवर्गीय समाजाचे असल्याचे माहित असतानाही जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी पाच आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना माणगाव तालुक्यातील हिरालाल महादेव मेथा हायस्कुल विळे येथे घडली. याबाबतची फिर्याद परशुराम हरिश्चंद्र आंबेतकर यांनी माणगाव पोलीस ठाण्यात उशिरा दिल्याने यांतील आरोपींवर ॲट्रॉसिटी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२ पाणथळ जागांचे भवितव्य अहवालबंद

। रायगड । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील महत्वाच्या उपनगरांमधील पाणथळ जमिनी विकसकांसाठी खुल्या करण्याच्या हालचाली वेगाने सुरू असताना या भागातील २२ पाणथळ जमिनींचे राज्य सरकारमार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष काय असतील याकडे आता पर्यावरण प्रेमींचे लक्ष लागले आहे. पाम बीच मार्गालगत असलेला डीपीएस तलाव तसेच टी. एस.चाणक्य परिसरातील पाणथळ भाग निवासी संकुलांसाठी खुला करण्याच्या जोरदार हालचाली सिडको तसेच नवी मुंबई महापालिकेच्या स्तरावर सुरु आहेत.

उरण, द्रोणागिरी, पट्ट्यातील पाणजे, तळोजा तसेच खारघर उपनगरातील पाणथळ जागांचे भवितव्यदेखील सर्वेक्षण अहवालात बंद झाले आहे. त्यामुळे नवी मुंबईतील पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या या जागा विकासकांसाठी खुल्या होणार की संरक्षित रहाणार हे स्पष्ट होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेशात आणि विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबईत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या पाणथळ जमिनी निवासी संकुलांसाठी खुल्या करण्यात येत असल्याच्या तक्रारी पर्यावरण प्रेमींकडून सातत्याने केल्या जात आहेत. नवी मुंबईत पाम बीच मार्गालगत खाडीकडील बाजूस असलेल्या मोक्याच्या जागा सिडकोने खासगी विकसकांसाठी खुल्या करण्याचा निर्णय यापूर्वीच वादग्रस्त ठरला आहे. नवी मुंबई महापालिकेने जाहीर केलेल्या प्रारुप आराखड्यात यापैकी काही जागा पाणथळ म्हणून जाहीर केल्या होत्या. त्यास सिडको प्रशासनाने घेतलेल्या हरकतीनंतर महापालिकेने जाहीर केलेल्या अंतिम विकास आराखड्यात यापैकी बहुसंख्य पाणथळी या निवासी संकुलांसाठी खुल्या करण्यात आल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

राज्यभरातील पाणथळ जमिनींसंबंधीच्या तक्रारी वाढू लागल्याने या जागांचे जिल्हानिहाय नकाशे आणि सविस्तर माहितीचे कागदपत्रे तयार करण्यासाठी राज्य सरकारच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने चेन्नईस्थित दि नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट या संस्थेची नेमणूक केली होती. या संस्थेने मार्च २०२४ पासून नवी मुंबई आणि उरण परिसरातील २२ पाणथळ जागांचे सर्वेक्षण केले आहे. या सर्वेक्षणादरम्यान पाम बीच मार्गालगत असलेल्या पाणथळ जमिनी खाडीकडील बाजूस असलेले पाण्याचे प्रवाह कृत्रिमरित्या बंद करुन कोरड्या करण्याचे प्रकारही उघडकीस आले होते. या पार्श्वभूमीवर सरकारमार्फत करण्यात आलेल्या पाणथळ जमिनींच्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष नेमके काय असतील याकडे आता पर्यावरणप्रेमींचे लक्ष लागले आहे.

पाणथळ जागा सुरक्षित राहणार?

नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात सिडको तसेच राज्य सरकारमार्फत वेगवेगळे विकास प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. यामुळे काही पाणथळ जागांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्याच्या तक्रारी यापूर्वीही पुढे आल्या आहेत. पाम बीच मार्गालगत असलेल्या पाणथळ जागा या फ्लेमिंगो अधिवासाचे मुख्य केंद्र मानले जाते. एनआरआय संकुलालगत असलेल्या डीपीएस तलावाचा परिसर तर महापालिकेने फ्लेमिंगो पॉईंट म्हणून जाहीर केला आहे. असे असताना सिडकोने यापैकी काही जागा विकासासाठी खुल्या करण्याचा निर्णय घेतल्याने पर्यावरण प्रेमी आणि शासकीय संघर्ष सध्या टिपेला पोहचला आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील २२ पाणथळ जागांचे भवितव्य अहवाल बंद झाल्याने पर्यावरण प्रेमींमध्ये या अहवालातील निष्कर्ष काय असतील याविषयी उत्सुकता आहे.

> **राज्यभरातल्या पाचशेहून अधिक पाणथळींचे सर्वेक्षण करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात मात्र ही संख्या याहून कितीतरी अधिक आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच या संदर्भात दिलेल्या निकालामुळे नवी मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण देशभरातल्या पाणथळी सुरक्षित करण्याचा मार्ग सुकर झाला आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारच्या स्तरावर झालेल्या या सर्वेक्षणाला काय अर्थ उरतो हाच मुळात प्रश्न आहे. या सर्व जागा पाणथळ म्हणून स्पष्टपणे जाहीर व्हायला हव्यात. असे असताना शासकीय प्राधिकरणच त्याविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत हे आश्चर्य वाटण्याजोगे आहे.**
>
> **– सुनील अग्रवाल, पर्यावरण तज्ज्ञ**

सर्वेक्षित जागा

- एनसीएससीएमकडून नवी मुंबई महापालिका हद्दीतील दारावे गावालगत असलेला लोटस तलाव, एनआरआय संकुलालगतचा फ्लेमिंगो पॉईंट, पाम बीच मार्गालगतचा टी.एस.चाणक्य पाणथळ क्षेत्र तसेच ज्वेल ऑफ नवी मुंबई या चार जागांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
- रायगड जिल्ह्यात द्रोणागिरी येथील पाणजे, खोपटे, शेवा, करळ पाणथळ, खांदेश्वर तलाव, जुई, खारघर, पेंधर, तळोजा भागातील पाणथळ जागांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.
- कळंबोली, खारघर सेक्टर २५ येथील पाणथळींच्या जागा तसेच सोनखार या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणाऱ्या जागांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून या संपूर्ण क्षेत्राचे नकाशे तसेच माहितीचे दस्तावेजीकरण करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

पत्रकार दीपक पाटील, जीवन पाटील यांना

द्रोणागिरी भूषण पुरस्कार जाहीर

। भाकरवड । वार्ताहर ।

वाघ्रण येथील पत्रकार दीपक पाटील व भाकरवड येथील पत्रकार जीवन पाटील यांना सन २०२४ चे द्रोणागिरी भूषण पुरस्कार जाहीर झाले आहेत. सेवाश्म सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रण रायगडचे संस्थापक अध्यक्ष रायगड भूषण पत्रकार दीपक पाटील यांना पत्रकारीतेतून सामाजिक कार्यासाठी तर मनस्वी मानव सेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रायगड भूषण पत्रकार भाकरवड यांनी शवसेवक केलेल्या कामासाठी पुरस्कार जाहीर केला आहे.

द्रोणागिरी स्पोर्ट्स क्लब आणि सामाजिक संस्था उरण रायगड

येथून गेले २४ वर्ष विविध क्षेत्रातून पुरस्कार प्रदान करून जिल्ह्यातील मान्यवरांचा सन्मान करीत असून सन २०२४ साठी रायगडमधून २७ जणांची निवड केली आहे. यामध्ये व्यक्तीगत आणि संस्था असा समावेश आहे. पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवारी (दि.२०) दुपारी तीन वाजता होणार आहे.

यशस्वी ध्यान महोत्सव संपन्न

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग येथील ॲड.दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ मध्ये तेज ज्ञान फाऊंडेशन तर्फे आयोजित रौप्यमहोत्सवी ध्यान महोत्सव अत्यंत यशस्वीरित्या पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रायगड भूषण डॉ.ॲड.के.डी.पाटील, रायगड भूषण माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत पाटील व रायगड भूषण डॉ. ॲड. निहा राऊत होते. पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाल्यानंतर प्रभात कोळवणकर यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक सरश्री यांची ध्यानाचे महत्व आणि तेज ज्ञान फाऊंडेशनचा २५ वर्षाचा लोकांना मिळालेला लाभ या विषयावर व्हिडिओ क्लिप दाखविण्यात आल्या.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. ॲड.के.डी.पाटील, माजी प्राचार्य डॉ.श्रीकांत पाटील व डॉ.ॲड. निहाय राऊत यांनी उपस्थितांना ध्यान

विषयक बहुमूल्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमास अलिबाग परिसरातील जवळपास दोनशे प्रेक्षक उपस्थित होते. तेजज्ञान फाऊंडेशनचे साधक बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांपैकी ज्येष्ठ नागरिक गजेंद्र दळी, रमेश नाईक, डॉ.हुलवान, डॉ. चंद्रकांत वाजे, डॉ. गांधी पोलीस स्टेशन अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे, लायन वनगे, माजी प्राचार्य अशोक देशमुख यांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रत्यक्ष ध्यानाचे प्रात्यक्षिक, ध्यानाने मानवाचे शारीरिक, मानसिक सामाजिक आर्थिक आणि अध्यात्मिक या पाच स्थरावर कशी प्रगती होते ही माहिती देण्यात आली आणि उपस्थित लोकांना ध्यान चॅलेंज म्हणजे २१, १५, ७ दिवस असे ध्यान करण्याचे चॅलेंज दिले. बहुतेकांनी ते ते चॅलेंज घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा कोळवणकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अलिबाग ज्ञान ध्यान केंद्राचे संयोजक तानाजी भोसले, गुरव व इतर यांनी खुप मेहनत घेतली. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

कृषी संवाद कार्यशाळेचे आयोजन

। वाघ्रण । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील मौजे पेढांबे येथील समाज मंदिरात कृषी संवाद कार्यशाळेचे आयोजन २० डिसेंबर शुक्रवारी सायंकाळी ६.३० वाजता केले असल्याची माहिती सिद्दी समृद्धी फोफेरीचे मालक नयन पाटील यांनी कळविले आहे. आंबा उत्पादन वाढीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान व पद्धत आंबा उत्पादक शेतकरी वर्गाला समजावी यासाठी सुप्रसिद्ध या क्षेत्रातील विलोवूड केमिकल्स लिमिटेड कंपनीकडून ह्या शिबिरात माहिती दिली जाणार आहे. पेढांबे पंचक्रोशीमध्ये आणि तालुक्यात आंबा उत्पादक असल्याने या संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी कंपनीचे जनरल मॅनेजर चंद्रकांत डुमरे, पुणे रिजन एरिया मॅनेजर राहुल पवार, विजय पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

भाताच्या पेंढ्यातून आर्थिक उत्पन्न

। उरण । वार्ताहर ।

तालुक्यात मोठ्या प्रमाणात भातशेतीचे उत्पादन घेतले जाते. मळणीनंतर उरलेल्या पेंढ्याला वैरण म्हणून मोठी मागणी आहे. या पेंढ्याचा उपयोग जनावरांच्या वैरणीसह सजावटीच्या वस्तू बनविण्यासाठी केला जात आहे. त्यामुळे या पेंढ्याच्या विक्रीतून शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्न मिळत आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे शेती मागे पडली आहे तसेच तालुक्यातील पशुधन कमी झाल्याने हा पेंढा शेतकरी घरात न वापरता विकत आहेत. भाताची मळणी झाली की शेतात पेंढा व्यवस्थित रचून साठवून ठेवला जात आहे. उरण तालुक्यात आणि घरात गाई, म्हशी, रेडे, बैल, बकऱ्या असे पशुधन मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे हा पेंढा नागरिक विक्री न करता आपल्याच गाई, म्हशी, बैलांना खाण्यासाठी राखून ठेवत असत.

- **वैरणीसह सजावटीच्या वस्तू बनविण्याचा कल**
- **पीओपीच्या मूर्ती बनवताना पेंढ्याचा वापर**

आता पशुधन कमी होत आहे. त्यामुळे गाई, म्हशींचे गोठेदेखील लुप्त होत चालले आहेत. त्यामुळे हा पेंढा उरण तालुक्यातील नागरिक विकत आहेत. त्यातून नागरिकांना चांगली आर्थिक प्राप्ती होत आहे. पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा येथे हा पेढा जनावरांचे खाद्य म्हणून वापरला जात आहे. त्याचप्रमाणे पेंढ्यापासून अनेक सजावटीच्या वस्तू बनवल्या जात असल्याने या पेंढ्याला मोठी मागणी आहे. पीओपीच्या मूर्ती बनवताना पेंढ्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे व्यापारी उरण तालुक्यातील गावोगावी जाऊन हा पेंढा गोळा करीत आहेत.

उरण, पनवेल जेएनपीए परिसरात

कंटेनर अपघातांची मालिका

। उरण । वार्ताहर ।

जेएनपीए बंदर आणि परिसरात ये-जा करणारी हजारो जड कंटेनर वाहने बेदरकारपणे हाकली जात आहेत. गेल्या दोन दिवसांत उरण, जेएनपीए आणि पनवेल येथील महामार्गावर तीन अपघात झाले आहेत. यात जीवितहानी टळली असली तर लहान वाहनांचे नुकसान झाले आहे.

जेएनपीए बंदरातून दररोज १५ हजारापेक्षा अधिक जड कंटेनर वाहने उरणच्या जेएनपीए बंदर ते पळस्पे व जेएनपीए ते आम्रमार्ग नवी मुंबई या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक करीत आहेत. यातील अनेक वाहने ही बेदरकारपणे वाहतूक करीत आहेत. याचा फटका या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकी व हलक्या वाहनांना बसत आहे.

त्यामुळे अनेक वाहनांना या कंटेनर वाहनांकडून धडका दिल्या जात आहेत. त्यात त्यांचे नुकसान होत आहे. या अपघातानंतर जड वाहनांचे चालक व मालकांकडून नुकसानभरपाई न देता उलट दमदाटी केली जात असल्याचे अपघातात नुकसान झालेल्या वाहन मालकांचे म्हणणे आहे.

सेवामार्ग मोकळे करा

जेएनपीए बंदराला जोडणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरील हलक्या व दुचाकी वाहनांना सुरक्षित प्रवास करता यावा याकरिता सेवा मार्ग बनविण्यात आले आहेत. मात्र या मार्गावर मोठया प्रमाणात जड कंटेनर वाहने उभी केली जात आहेत. त्यामुळे वाहने मुख्य मार्गावरून प्रवास करीत आहेत. परिणामी अपघात होण्याचा धोका वाढत आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरील सेवा मार्ग मोकळे करण्याची मागणी केली जात आहे.

चालकांना प्रशिक्षण

उरण, पनवेल, न्हावा आदी कंटेनर वाहनांवरील चालकांचे प्रबोधन करून सुरक्षेचे प्रशिक्षण देण्याचे काम सुरू आहे. यामुळे अपघात कमी होण्यास मदत होईल अशी माहिती नवी मुंबईचे वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिली आहे.

श्री बापूजी महाराज यांचा द्वितीय वर्धापन दिन साजरा

। कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील वैजनाथ येथे गावदेव श्री बापुजी महाराज यांचा द्वितीय वर्धापन दिन साजरा करण्यात आला. सकाळी ८ ते ९ वाजता गावदेव बापुजी महाराज यांचा अभिषेक, १० ते १२ श्री सत्यनारायणाची महापूजा, १२. ते १२.३०. महाआरती, दुपारी ३ ते रात्री ८.०० वाजेपर्यंत गावातून देवाची पालखीची मिरवणूक, रात्री ८.०० ते ८.३०. देवाची मंदिरात महाआरती, ८.३० ते ९.३०. महाप्रसाद, रात्री १० नंतर भजन जागर करून एकदिवसीय सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी किशोर महाबळे, जनार्दन महाबळे, दत्तात्रेय वातेरे, मनोज सावरकर, जानु वातेरे, महिला मंडळ, नवतरुण मित्र मंडळ उपस्थित होते.

पोस्को एशिया फेलोशिप पुरस्कार

। माणगाव । वार्ताहर ।

पोस्को टी. जे. पार्क फाऊंडेशन आणि पोस्को महाराष्ट्र स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पोस्को एशिया फेलोशिप पुरस्कार सोहळा २०२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे पार पडला. हा सोहळा विद्यापीठासाठी एक अभिमानाचा क्षण ठरला, जिथे १५ विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनती, अभ्यासू वृत्ती आणि उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याला पोस्को टी. जे. पार्क फाऊंडेशनचे प्रमुख ओह यंग डल हे दक्षिण कोरियाहून विशेष उपस्थित होते. पोस्को महाराष्ट्रचे स्टीलचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक किम दे अप, विद्यापीठाचे मान्यवर कुलगुरू, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या भव्यतेने उपस्थितांना नवीन उर्जा आणि प्रेरणा दिली.

यावर्षीसाठी निवड झालेल्या १५ विद्यार्थ्यांना या सोहळ्यात प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह आणि ८०० अमेरिकन डॉलर्स प्रदान करण्यात आले. २०१५ पासून सुरु असलेल्या या उपक्रमात आत्तापर्यंत १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला आहे. या फेलोशिपसाठी निवड होणे हे सहज शक्य नव्हते; विद्यार्थ्यांना मेहनतीच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचावे लागते.

पोस्को टी. जे. पार्क फाऊंडेशनचे प्रमुख ओह यंग डल यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले, पोस्को फेलोशिप मिळवणे हे मेहनतीचे प्रतीक आहे. यासाठी कठीण परिश्रम आणि दृढ निश्चयाची आवश्यकता आहे. तुमची स्वप्ने मोठी असली पाहिजेत, आणि त्यांना साकार करण्यासाठी तुम्ही कोणतीही कसर ठेवू नका. हा तुमचा पहिला टप्पा आहे, आता आयुष्यात आणखी मोठे यश मिळवा.

सात दिवसीय विशेष निवासी शिबीर

। कोर्लई । वार्ताहर ।

मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विशेष निवासी शिबीर मजगाव येथे उत्साहात पार पडले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ.टी.पी.मोकल, अंजुमन विज्ञान महाविद्यालयाचे अध्यक्ष स.जैनुद्दीन उ. कादिरी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय, राष्ट्रीय सेवा योजनेची ध्येय व उद्धीष्टे, राष्ट्रीय सेवा योजना व ग्राम शहर विकास, व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेचा वाटा या विषयांवर डॉ. टी.पी. मोकल यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता केली व प्लास्टिकचे

संकलन केले. तसेच गावातील सार्वजनिक ठिकाणाची साफसफाई करण्यात आली. विद्यार्थ्यांनी गावात नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराबाबत जनजागृती करण्यात आली. घरोघरी भेट देवून शिबिराविषयी माहिती देण्यात आली. तसेच गावातील नदीकाठची स्वच्छता करण्यात आले.

पनवेल येथील झुनझुनवाला शंकरा नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने पंचक्रोशी मजगाव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा रुग्णालयातील डॉक्टर आणि तंत्रज्ञ डोळ्यांच्या दोषाने त्रस्त असलेल्या लोकांची तपासणी करण्यासाठी उपस्थित होते.या शिबिराचा मुरुड परिसरातील सुमारे २०० लोकांनी लाभ घेतला. या शिबिरात २५ जणांना मोतीबिंदू आढळून आले असून त्यांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथील शंकरा हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आहे. सुमारे ५० लोकांना स्वस्त दरात चष्म्यांचा लाभ झाला. यामध्ये रा.से.योजना स्वयंसेवकांनी मोठा सहभाग घेतला.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग**
- **अलिबाग शहरातील नामांकित आर्किटेक्टस् फर्मसाठी अनुभवी ऑटोकॅड ड्राफ्टस्मन पाहिजे. संपर्क: ९८२२०५४७८८**
- **तात्काळ पाहिजे :- अलिबाग येथे हॉटेलमध्ये काम करण्यासाठी कुकचा हेल्पर आणि वेटर तसेच व्हेज आणि नॉनव्हेज बनविण्यासाठी पुरुष/महिला पाहिजे. संपर्क ९९६९५४१२१३, ९०२९०११५१६**
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२**

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

माहिती व जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह यांचे प्रतिपादन

कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक

। नागपूर । वृत्तसंस्था ।

माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच एआयने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणाऱ्या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता एआयच्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव

तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रूट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी दिला.

एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत एआयला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणाऱ्या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआयचा वापर होणार नाही, यासाठी एआयची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

। रसायनी । वार्ताहर ।

मोहोपाडा येथे जुगार खेळणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. यात १९ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मोहोपाडा गावाच्या हद्दीतील प्रिआ स्कुलजवळ असलेल्या आंब्याच्या झाडाखाली मोकळ्या जागेत पाच आरोपी हे बेकायदेशीररित्या पैसे लावून पत्ते खेळत होते. त्यांच्याकडे २ हजार १५० रूपयाची रोख रक्कम तसेच १७ हजार रूपये किमतीचे ३ मोबाईल असा एकुण १९ हजार १५० रूपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.

तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात

पत्ताः नवीन प्रशासकीय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड- ४१०२०१

३२ ग दावा क्रमांक : टेनन्सी/एस आर/३०-२०२२

जाहीर पेपर नोटीस

१.श्री.सदानंद वाळकु फोपे
२.अलका हिरू माळी
३.काळुराम वाळकु फोपे
४.शांताबाई मुकुंद हुमणे — अर्जदार/कुळ
५.सिताबाई वाळकु फोपे
६.सुरेखा नारायण भांडे
वरील सर्व रा.बलिवरे ता.कर्जत जि.रायगड

विरूद्ध

१.श्री.रामचंद्र हिरोबा शिंगवा
२.श्रीम.देवकी शिवराम पवार — सामनेवाला/जमिनमालक
वरील १ व २ रा.बलिवरे, ता.कर्जत जि.रायगड

जमिनीचे वर्णन

तालुक्याचे नाव	गावाचे नाव	भुमापन क्र. (सर्व्हे नं.)	पोट हिस्सा क्रमांक	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रू.पैसे
कर्जत	बलिवरे	६१	२	१.३४.००	०.८६

अर्जदार यांनी तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांचे न्यायालयात वरील जमिनीचे महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग प्रमाणे खरेदी किंमत होणेकरीता तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत यांच्या न्यायालयात दिनांक १६/११/२०२२ रोजी अर्ज दाखल केला आहे.

तरी या दाव्यामध्ये हितसंबंध असलेल्या अर्जदार व सामनेवाले स्वतः किंवा त्यांचे अधिकृत वारसा अगर प्रतिनिधी यांनी सुनावणीच्या दिवशी व वेळी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहून काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत द्यावयाची असल्यास दिनांक ३०/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता ठिकाण कर्जत येथे शेतजमिन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी आपणास (आपल्या विधिज्ञामार्फत) यावरून फर्मावित आहेत. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी (विधिज्ञामार्फत) कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यांत येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात गैरहजेरीत सुरूवात करण्यांत येईल. व प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार निर्णय दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत — सही/-
दिनांक : १६/१२/२०२४

(धनंजय जाधव)
शेतजमिन न्यायाधिकरण
तथा तहसिलदार कर्जत

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे भाल, ता. अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाचे जमिन मिळकती पैकी विद्यमान मालक १) गुरूनाथ पांडुरंग पाटील, २) लक्ष्मी नारायण सानगर, ३) छाया अनंत गावंड, ४) प्रिती अंकुश थेर, ५) तृप्ती बंड्या म्हात्रे, ६) ऋषिकेश शंकर पाटील, यांचे अविभक्त हिश्याचे खाली नमुद केलेले क्षेत्र कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पै.)
भाल ता. अलिबाग	४२/१	जिरायत ०-८२-४० पो.ख. ०-१६-७० एकुण ०-९९-१०	२०.०७

वर वर्णन जमिन मिळकती पैकी विद्यमान मालक यांचे अविभक्त हिश्याचे ०-५३-०० हे. आर. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

सदरहू वर्णन केलली मिळकत निर्वेध, बोजा रहीत असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही नोंदणीकृत अगर अनोंदणीकृत गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जप्ती, लिज, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा, वारसाहक्क, मालकी, एम.ओ.यू. करार, ताबेकब्जा वहीवाट, रस्ता वहिवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत लेखी स्वरूपात, प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडून दिला आहे असे समजुन, गृहीत धरून सदरचा विक्री व्यवहार खरेदीखत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १९/१२/२०२४

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. ९९२२७०७०१२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत आहे, या मिळकतींचे मालक अनंता नारायण बाम यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर/प्लॉट नंबर	क्षेत्रफळ आर.चौ.मी.	आकार रु. पै.
१/२	००-०६.०० (६०० चौ.मी.)	१२-००

या मिळकतींस भुमी अभिलेख यांचेकडील सिटी सर्व्हे क्रमांक ८४८ ने नोंद करणेंत आलेली आहे.
या मिळकतीवर बांधणेत आलेला बंगलो/अथवा निवासी इमारत

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकत व त्यामधील घर या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९ डिसेंबर २०२४

ॲड. शरद आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ. हौ. सो. लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ९५२७२८२५२५

निवडणूक निर्णय अधिकारी, अलिबाग पथविक्रेता समिती तथा
सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहिला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता.अलिबाग जि.रायगड. पिन कोड ४०२२०१
Email ID : aresalibag@gmail.com

जाहीर सुचना

अलिबाग नगरपरिषद विक्रेता समिती पथविक्रेते प्रतिनिधी सदस्यांकरीता २ महिला राखीव जागासांठी आरक्षण निश्चित करणेकरीता सोडत कार्यक्रम

ज्याअर्थी मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, यांचेकडील जाक्र काआ/औस/प.वि/जिल्हाधिकारी रायगड/को.वि./आदेश /२०२४/कार्य - ९ दिनांक १४/०८/२०२४ च्या आदेशाने सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग यांची अलिबाग नगरपरीषद पथविक्रेता समितीची निवडणूक घेणेकरीता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ (यानंतर उपरोक्त अधिनियम असा उल्लेख करणेत येईल) व महाराष्ट्र पथ विक्रेता उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ यानंतर उपरोक्त नियम असा उल्लेख करणेत येईल) नेमणूक केलेली आहे.

आणी ज्याअर्थी उपरोक्त नियमाचे नियम ११ (३) नुसार पथविक्रेते प्रतिनिधी यांची पथविक्रेता समितीवरील सदस्यांची संख्या निश्चित केलेली आहे व नगरपरीषद प्रशासन संचालनालय यांचेकडील दिनांक १३/०४/२०२३ च्या परीपत्रकाने महिलांसाठी आरक्षीत ठेवण्याच्या ३ जागांपैकी २ महिला राखीव जागासांठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांग व्यक्ती या प्रवर्गामधून चिठ्ठीद्वारा जागा निश्चित करण्यात अशा सुचना आहेत व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी या पद्धतीद्वारे आरक्षण सोडत करावी अशा सुचना आहेत;

त्याअर्थी अलिबाग नगरपरीषद, पथविक्रेता समिती पथविक्रेते प्रतिनिधी सदस्यांकरीता २ महिला राखीव जागासांठी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांग व्यक्ती या प्रवर्गामधुन चिठ्ठीद्वारा जागा निश्चित करणेसाठी आरक्षण सोडत दिनांक २३/१२/२०२४ रोजी सकाळी १२.०० वा अलिबाग नगरपरीषद सभागृहामध्ये ठेवणेत येत आहे तसेच नोंदणीकृत पथविक्रेते यांनी ज्यांस उपस्थित रहावयाचे आहे त्यांनी उपस्थित रहावे.

दिनांकः १२/१२/२०२४ — सही/-

(श्रीकांत पाटील)
निवडणूक निर्णय अधिकारी
अलिबाग नगरपरीषद पथविक्रेता समिती
(पथविक्रेता संरक्षण व पथ विक्री विनियमन)
अधिनियम, २०१४ अन्वये तथा सहायक निबंधक
सहकारी संस्था अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविणेंत येते की मौजे पाझर, तालुका अलिबाग, येथील भूमापन क्रमांक ३७ एकूण क्षेत्र ०-४७-६ पैकी पूर्व दिशेकडील ०-२५-६ आर्स् अशी मिळकत विद्यमान मालकांकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर व्यवहार पूर्ण करणेपूर्वी सदर मिळकतींमध्ये त्रयस्थ व्यक्तीची काही जडजोखीम असल्यास त्याची माहिती मिळविण्याकरीता ही नोटीस देण्यांत येत आहे.

तरी, सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २०/१२/२०२४

ॲड.संजय माधव आचार्य
मु.पोस्ट चौल
तालुका अलिबाग, जिल्हा रायगड.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वायशेत, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १. रुपाली रामचंद्र म्हात्रे, २. सोनाली पांडुरंग पाटील यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे आर.)	आकार (रू. पैसे)
वायशेत, ता. अलिबाग जि. रायगड	३/१६	एकूण क्षेत्र ०.०९.९०	२.८१

वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.०२.८९ हे. आर

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे, येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १८/१२/२०२४

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे देऊळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक दत्तात्रय सटु पन्हाळे वगैरे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पै.
४७	२	०-३०-९०	२-२५

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २०/१२/२०२४

ॲड. सी. बी. ओसवाल
बी.कॉम. एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. साईगणेश रविंद्र सुखधरे यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पैसे)
पोयनाड, ता. अलिबाग जि. रायगड	१३८/४	क्षेत्र ०.३९.४० पो.ख. ०.०७.६० एकूण ०.४७.००	१०.००

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १९/१२/२०२४

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२१८६७४०

शुद्धीपत्रक

दि. १९/१२/२०२४ रोजी दैनिक कृषीवल वर्तमानपत्रात पान क्र. ७ वर पाली नगरपंचायतीची जाहीर निविदा सूचना प्रसिद्ध झाली. त्यामध्ये कामाच्या अटी व शर्ती यामध्ये क्र. ३ यात निविदा फॉर्म व इसारा रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष दि. ९/८/२०२५ असे छापण्यात आले आहे. तरी ते दिनांक २/१/२०२५ असे वाचण्यात यावे, ही विनंती.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, अलिबाग, कल्पतरु इमारत,
मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, जि. रायगड

चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र. **५३८/२०२४**
सार्वजनिक न्यासाचे नांवः- **Mary Matha Church Charitable Trust**
ट्रस्ट नोंदणी क्रमांक :-**D-२३(Raigad)**

श्री. रॉय वर्गीस ..... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे ?
२. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) स्थावर मिळकत (वर्णन) :-

All the shop No. 4 admeasuring 17.834 SQM Plus 11.61 SQM OTLA Built up area on the ground Floor SAI SRUSHTI COOPERATIVE HOUSING SOCIETY LTD. Being and lying at; Plot No. 51, 12.5% G. E. Scheme, Sector 35, Kamothe, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad constructed in the year 2010 a structure of Ground plus 7 upper Floors with 2 Lifts, be and is hereby purchased form KAIRALI ENTERPRISES for a total consideration of Rs. 24,00,000/- (Rupees Twenty Four Lakhs) for the Object of the Trust.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा लेखी देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून ३० दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी दिली.

शिक्का

(प्र) अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, रायगड

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, अलिबाग, कल्पतरु इमारत,
मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, जि. रायगड

चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र. **५३७/२०२४**
सार्वजनिक न्यासाचे नांवः- **Mary Matha Church Charitable Trust**
ट्रस्ट नोंदणी क्रमांक :-**D-२३(Raigad)**

श्री. रॉय वर्गीस ..... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे ?
२. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) स्थावर मिळकत (वर्णन) :-

All the shop No. 2 admeasuring 21.420 SQM Plus 13.94 SQM OTLA Built up area on the ground Floor SAI SRUSHTI COOPERATIVE HOUSING SOCIETY LTD. Being and lying at; Plot No 51, 12.5% G. E. Scheme, Sector 35, Kamothe, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad constructed in the year 2010 a structure of Ground plus 7 upper Floors with 2 Lifts, be and is hereby purchased form SHALOM ENTERPRISES for a total consideration of Rs. 26,00000/- (Rupees Twenty Six Lakhs) for the Object of the Trust.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा लेखी देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून ३० दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी दिली.

शिक्का

(प्र) अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, रायगड

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, अलिबाग, कल्पतरु इमारत,
मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, जि. रायगड

चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र. **५३६/२०२४**
सार्वजनिक न्यासाचे नांवः- **Mary Matha Church Charitable Trust**
ट्रस्ट नोंदणी क्रमांक :-**D-२३(Raigad)**

श्री. रॉय वर्गीस ..... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे ?
२. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) स्थावर मिळकत (वर्णन) :-

All the shop No. 3 admeasuring 21.647 SQM Plus 13.94 SQM OTLA Built up area on the ground Floor SAI SRUSHTI COOPERATIVE HOUSING SOCIETY LTD. Being and lying at; Plot No 51, 12.5% G. E. Scheme, Sector 35, Kamothe, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad constructed in the year 2010 a structure of Ground plus 7 upper Floors with 2 Lifts, be and is hereby purchased form PARADISE ENTERPRISES for a total consideration of Rs. 26,00,000/- (Rupees Twenty Six Lakhs) for the Object of the Trust.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा लेखी देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून ३० दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी दिली.

शिक्का

(प्र) अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, रायगड

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, अलिबाग, कल्पतरु इमारत,
मुख्य पोस्ट ऑफीस जवळ,
अलिबाग, जि. रायगड

चौकशीची जाहीर नोटीस

बदल अर्ज क्र. **५३५/२०२४**
सार्वजनिक न्यासाचे नांवः- **Mary Matha Church Charitable Trust**
ट्रस्ट नोंदणी क्रमांक :-**D-२३(Raigad)**

श्री. रॉय वर्गीस ..... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१. वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे ?
२. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) स्थावर मिळकत (वर्णन) :-

All the shop No. 1 admeasuring 17.834 SQM Plus 11.61 SQM OTLA Built up area on the ground Floor SAI SRUSHTI COOPERATIVE HOUSING SOCIETY LTD. Being and lying at; Plot No 51,12.5% G. E. Scheme, Sector 35, Kamothe, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad constructed in the year 2010 a structure of Ground plus 7 upper Floors with 2 Lifts, be and is hereby purchased form EDEN ENTERPRISES for a total consideration of Rs. 24,00,000/- (Rupees Twenty Four Lakhs) for the Object of the Trust.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा लेखी देणेचा असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखे पासून ३० दिवसांचे आंत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी दिली.

शिक्का

(प्र) अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग, रायगड

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड,
ता. मुरूड, जि. रायगड)

ज. म. र अर्ज ९३/२०२४

जाहिर नोटीस

खुर्शीदा मेहमुद दामाद
रा. मु. दरबारोड मुरूड, — अर्जदार
पो. ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत मजगाव, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार खुर्शीदा मेहमुद दामाद, हिचा जन्म दिनांक २७/०७/१९७५, रोजी माहेरच्या घरी म्हणजे मौजे मजगाव, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत मजगाव कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार खुर्शीदा मेहमुद दामाद हिचा दिनांक २८/०७/१९७५ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे न्यायालयांत दि. ०७/०१/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती असल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही. असे समजुन अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता ३१/१०/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

कळावे. — सही/-

(रोहन शिंदे)
तहसिलदार मुरुड-जंजिरा

ग्रुप ग्रामपंचायत आपटा
निविदा सुचना

अ. क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रक रक्कम
१)	आपटा मोहल्ला येथे अशफाक पटेल ते निसार पटेल गटार बांधकाम करणे.	१५००००/-
२)	रोहिदास समाजमंदिर दुरूस्ती करणे.	१६७२८७/-
३)	मौजे आपटा येथे भुस्तर पाणी साठवण टाकी बांधणे	९९९४२१/-
४)	सौर उर्जेवर पाणीपुरवठा योजना करणे	३५९३५०/-
५)	दाभोळवाडी गटार करणे.	११७७४०/-

निविदा उघडण्याचा कालावधी - २६/१२/२४ सकाळी ११:३० वाजता येणारी फी ही ग्राम निधीतून देणेत येईल.

अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

(१) अधिकृत ठेकेदारांनी कोरे निविदा संच दि. १९/१२/२०२४ ते २६/१२/२०२४ सुट्टीचे दिवस वगळता अर्ज करावेत नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
२) अर्जदारांनी सदर कोरे निविदा प्रपत्र दि. १९/१२/२४ ते २६/१२/२४ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने फी भरून उपलब्ध होतील.
३) भरलेल्या निविदा दि. २६/१२/२४ रोजी सकाळी ९:३० ते ११.०० या वेळेत स्वीकारण्यात येतील व शक्यतो त्याच दिवशी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येतील.
४) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्ट/रोखीने स्वीकारण्यात येईल ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत आपटा यांचे नावी असावा.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक अनुभवी ठेकेदारास प्राधान्य देण्यात येईल.
६) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत रक्कम २% आयकर व १% इन्सुरन्स २% ह्या रकमा परस्पर वजावट केल्या जातील.
७) काम मंजूर झालेल्या निविदा धारकास रु. ५०० च्या स्टम्प पेपरवर करारनामा लिहून द्यावा लागेल.
(८) सदरील काम पंचायत समितीकडील प्राप्त आराखड्यानुसार व ESTIMATE नुसार करायचे आहे.
९) सदरील काम पंचायत समितीकडील अभियंते व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली करणेचे आहे.
१०) एक अगर सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सही /- — सही /-
ग्रुप ग्रामपंचायत आपटा — **ग्रुप ग्रामपंचायत आपटा**
सरपंच — **ग्रामविकास अधिकारी**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही या मिळकतीचे विद्यमान मालक संजीव माधव जोशी, सुरेंद्र माधव जोशी, सुनीता माधव जोशी, व हृषीकेश जयंत चेऊलकर रा.अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड, यांचेकडुन कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत. तसेच या मिळकतीबाबत सुरेंद्र माधव जोशी, सुनीता माधव जोशी, व हृषीकेश जयंत चेऊलकर रा. अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड, माझे अशिलांनी साठेकरार देखील केलेले आहेत.

-: मिळकतींचे वर्णन :-

	मौजे	स. नं.	हि. नं.	क्षेत्र हे. आर	आकार रु. पैसे
१	वरसोली	८९	१ अ	०.८२.२	१५.६४
२	वरसोली	८९	१ ब	०.४६.६	८.७८
३	वरसोली	८४	०	०.१३.९	२.८१
४	वरसोली	८१	०	०.०४.०	१.००
५	वरसोली	८९	२	०.०८.०	--
६	वरसोली	९०	१	०.९७.४६	१६.१२
७	वरसोली	८२	२	०.०६.९	१.६८
८	वरसोली	९१	१	०.२८.६	६.७७
९	वरसोली	९१	२	०.७१.३	१०.५४

सदर मिळकती या पूर्णपणे निर्वेध व बोजारहित असुन या मिळकतीमधील आपले मालकी हक्क अबाधित आहे, तसेच सदर मिळकती या आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहेत असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, रस्ता, वहिवाट, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा संजीव माधव जोशी, सुरेंद्र माधव जोशी, सुनीता माधव जोशी, व हृषीकेश जयंत चेऊलकर रा. अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड, यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकती बाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर मागाहून येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग.
दिनांक : /१२/२०२४

ॲड. सचिन शंकर पाटील
रा. आनंदी प्राईड बिल्डींग, रूम नं. ३०२,
३ रा मजला, जुनी बाजारपेठ, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
Mob.9823126927

‘प्रभाविष्कार’ अंतर्गत गुणदर्शन कार्यक्रम

। अलिबाग । प्रतिनिधी ।

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या ‘प्रभाविष्कार’ अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक मराठी शाळा आणि बी.एड. महाविद्यालयाचा विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग महारुद्र नाळे, पनवेल नगरपरिषदेचे माजी नगरसेवक शेकाप नेते गणेश कडू, शेकापचे जेष्ठ नेते माजी जिल्हा परिषद सदस्य द्वारकानाथ नाईक, संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, विविध ग्रामपंचायत सरपंच व सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक निलेश मगर, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रिना म्हात्रे, बी. एड. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली रगडे व इतर प्राचार्य, मुख्याध्यापक, मुख्य कार्यालयाचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कारचे सादरीकरण केले.

भारताचा बांगलादेशवर दणदणीत विजय

अवघ्या तेराव्या षटकात गाठले लक्ष्य

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय १९ वर्षांखालील महिला संघाने आशिया चषक २०२४ स्पर्धेत बांगलादेशविरूद्धचा दणदणीत विजय मिळवला आहे. भारताने हा सामना अवघ्या १२.१ षटकातच जिंकला आहे. भारताने प्रथम गोलंदाजी करत बांगलादेश संघाचा डाव ८ बाद ८० धावांवर रोखला. प्रत्युत्तरात भारताची सलामीवीर जी त्रिशाने ५८ धावांची नाबाद खेळी केली आणि भारताने सामन्यात ८ गडी राखत बाजी मारली आहे. याआधी भारताने स्पर्धेत पाकिस्तान व नेपाळ संघाला पराभूत केले आहे.

प्रथम फंलदाजीसाठी आलेल्या बांगलादेशचा पहिला बळी मिळवण्यासाठी भारताला ५.२ षटकांपर्यंत वाट पाहावी लागली होती. २७ व्या षटकात भारताला पहिला बळी मिळाला. ज्यामध्ये मस्त इव्हा १४ धावा करून माघारी परतली. त्यानंतर बांगलादेशचे गडी बाद व्हायला सुरूवात झाली. यावेळी, बांगलादेशच्या अवघ्या ४ खेळाडूंना दुहेरी धावा करता आल्या. त्यांना २० षटकांअंती ८० धावांपर्यंतच मजल मारता आली. भारतीय गोलंदाज आयुषी शुक्ला हीला सामन्यात ३ बळी घेण्यात यश आले. सोनम यादवला २, तर मिथीला व्ही शबनम शकील यांना प्रत्येकी १ बळी घेताला.

लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला १० धावांवर पहिला गडी गमवावा लागला. सलामीवीर जी कामिलिनीला शून्यावर माघारी परतावे लागले. तिच्या जागी फलंदाजीसाठी आलेली सानिका चाळकेही १ धावेवर बाद झाली. दोघींनाही मस्त अनिशा अक्तर सोबा हीने बाद केले. मात्र, त्यानंतर सालामीवर जी त्रिशा व कर्णधार निकी प्रसाद हिने दमदार फटकेबाजी केली. जी त्रिशाने ४५ चेंडूत ५८ धावांची नाबाद खेळी केली. ज्यामध्ये तिने १० चौकार ठोकले. तर, निकी प्रदासने १ चौकार व २ षटकारांसह १५ चेंडूत २२ धावांची खेळी केली. दोघींनी ४६ चेंडूत ६४ धावांची नाबाद खेळी केली आणि अवघ्या १२.१ षटकात भारताला विजय मिळवून दिला.

वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन गोखले एज्युकेशन सोसायटी संचलित वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वरिष्ठ आणि कनिष्ठ गटात थाळीफेक, भालाफेक, लांब उडी, १००-२०० मीटर धावणे असे मुले व मुली वैयक्तिक आणि खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, कॅरम व बुद्धिबळ या सांघिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य व गुणांना संधी मिळावी, त्यांची प्रकृती निकोप व निरोगी राहण्यासाठी खेळाचे महत्व कळावे. तसेच, अपयश पचविण्याची सवय लागावी, वाट बघण्याची व नकार अपयश मानहानी खेळाडू वृत्तीने व मोठ्या मनाने स्वीकारता यावी, यासाठी या स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयातर्फे करण्यात आले होते.

रत्नागिरीच्या खेळाडूंचे घवघवीत यश

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

तायक्वांदो असो. ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली गोवा तायक्वांदो असो.च्या सहकार्याने तायक्वांदो अकॅडमी ऑफ वास्को आयोजित खुली राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गोव्यातील म्हापसा येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स इनडोर स्टेडियम पेडम येथे दि. १३ ते १५ डिसेंबर रोजी या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत रत्नागिरीच्या खेळाडूंनी घवघवीत यश मिळवले आहे.

या खुल्या राष्ट्रीय स्पर्धेत देशाच्या विविध राज्यातून ६५० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. गोव्यात प्रथमच घेण्यात आलेल्या या खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत रत्नागिरीच्या एस.आर.के क्लबच्या खेळाडूंनी ८ सुवर्ण, ४ रौप्य तर ४ कांस्यपदके पटकावली आहेत. यात स्वरा साखळकर (क्यूरोगी पुमसे), मृण्मयी वायंगणकर, रोहित कुंदकर, स्वर्णिका रसाळ, यश भागवत, विधान कांबळे, सलोनी सुर्वे या खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवले आहे. अद्वैत मिश्रा, तुळजा हर्षे, प्रांजल लांजेकर, रावी वारंग यांनी रौप्यपदकावर, तर यज्ञा चव्हाण, गार्गी घडशी, तीर्था लिंगायत यांनी कांस्यपदक पटकावले आहे. याव्यतिरीक्त आयुष चव्हाण, निर्मित सावंत, श्रेयसी हातीसकर या खेळाडूंनीही स्पर्धेत आपला सहभाग नोंदवला होता.

● अलिबाग तालुक्यातील वाडगाव-रसानी टेकडी येथे महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामना भिल्लेश्वर किहीम आणि दत्त-त्रेय क्रीडा पनवेल यांच्यात रंगला. या स्पर्धेत भिल्लेश्वर किहीम संघ अंतिम विजेता ठरला असून त्यांना माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील, सामन्यांचे आयोजक जयेंद्र भगत आदी मान्यवरांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

प्रशिक्षकपदी योगेश पवारची निवड

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

संपूर्ण देशभरात सुप्रसिद्ध असलेली इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) टेनिस बॉल टी-१० (पर्व दुसरे) क्रिकेट स्पर्धा काही दिवसातच सुरू होणार आहे. या स्पर्धेत सहभागी असलेल्या फाल्कन राइजर्स हैदराबाद संघाच्या फलंदाजीच्या प्रशिक्षकपदी रायगड जिल्ह्यातील पेणचा दमदार फलंदाज माजी रणजीपटू योगेश पवार यांची निवड करण्यात आली आहे. योगेश पवार हे महाराष्ट्राच्या संघासाठी रणजी ट्रॉफी सामने खेळले आहेत. एक दमदार डावखुरा फलंदाज म्हणून पवार यांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात आहे. योगेश पवार सध्या टाइम्स् शिल्ड, कांगा लीग सारख्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धा खेळत आहेत.

नांदगाव विद्यालयात क्रीडा महोत्सव

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. नामदेव येसू खैरे यांच्या स्मृती दिनानिमित्त सुधागडातील नांदगावच्या संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात क्रिडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी शांताराम लहाने, सखाराम खैरे, राकेशकुमार शर्मा, अनंता मराठे, दत्ताराम शिंदे, भिकुनाथ म्हसकर, संतोष कोंडे, राहुल सोळंकी, प्राचार्य बबन पालव वे शिक्षक वृंद उपस्थित होते.

या स्पर्धांनिमित्त विद्यार्थ्यांची बौद्धिक व शारीरिक क्षमता विकसित होण्यासाठी शालेय क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा दि. १९,२०,२१ डिसेंबर रोजी संपन्न होत आहेत. या स्पर्धेत गोळामफेक, थालिफेक, धावणे, लांब उडी, उंच उडी, कबड्डी, खो-खो या वैयक्तिक व सांघिक खेळातून विद्यार्थी आनंद लुटत आहेत. वेगवेगळ्या वर्गातील खेळाडूंमध्ये स्पर्धा लावून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास मदत होत आहे. या स्पर्धेतील विजयी संघ तसेच खेळाडूंचा २७ डिसेंबर रोजी संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणगौरव सोहळा करण्यात येणार आहे.

चार संघ उपांत्यपूर्व फेरीत दाखल

बळीराम क्रीडा मंडळ कबड्डी महोत्सव

। मुंबई । प्रतिनिधी ।

बळीराम क्रीडा मंडळाने ५१व्या कबड्डी महोत्सवानिमित्त काळाचौकी येथील आंबेवाडीतील बळीराम मंडळाच्या पटांगणावर कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत श्रीराम क्रीडा विश्वस्त, दुर्गामाता स्पोर्ट्स, गुड मॉर्निंग आणि जय भारत यांनी प्रथम श्रेणी पुरुष गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

पुरुषांच्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात श्रीराम क्रीडा विश्वस्त मंडळाने विजय नवनाथ मंडळाचा प्रतिकार ३६-२३ असा मोडून काढत उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. पूर्वार्धात १४-१८ असे पिछाडीवर पडलेल्या श्रीराम संघाने उत्तरार्धात २ लोण देत व एक अव्वल पकड करीत बाजी पलटविली. तुषार शिंदे, अंकुश पार्ले यांच्या तुफानी चढाया, त्याला आदित्य पार्लेची मिळालेली पकडीची भक्कम साथ त्यामुळे श्रीरामने हा मोठा विजय प्राप्त केला. विजय नवनाथचे तेजस वर्दम, हर्ष लाड यांचा खेळ उत्तरार्धात पूर्ण ढेपाळला.

दुर्गामाता स्पोर्ट्सने विजय बजरंग व्यायाम शाळेला ४२-२९ असे लोळविले. पहिल्या डावात २ लोण देत २५-०८ अशी मोठी आघाडी घेणाऱ्या दुर्गामाताने दुसऱ्या डावात मात्र सावध पवित्र घेतला. याचा फायदा घेत विजय बजरंग ने लोणची परत फेड करीत आघाडी कमी केली. मात्र, विजयापासून ते वंचित राहिले. रुपेश महावरे, अमित माने, क्षितिज इंगळे दुर्गामाता कडूनकडून उत्कृष्ट खेळले.

जय भारत मंडळाने सूर्यकांत व्यायाम शाळेचा प्रतिकार ३०-२० असा मोडून काढला. विश्रांतीला १६-०९ अशी आघाडी घेणाऱ्या जय भारतने नंतर देखील तोच जोश कायम राखत विजयाला गवसणी घातली. निखिल पाटील, सिद्धेश सावंत यांच्या झंझावाती चढाया त्यांना साहिल डगरे याची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. सूर्यकांत कडून सिद्धेश आडे, प्रतिक तळेकर यांनी उत्कृष्ट लढत दिली.

शेवटच्या सामन्यात गुड मॉर्निंगने यश मंडळाचा ४३-२५ असा सहज पाडाव केला. मध्यांतराला २८-१० अशी आघाडी घेणाऱ्या गुड मॉर्निंगने पूर्ण डावात २ लोण, ४बोनस व ३ अव्वल पकडीची नोंद केली. शार्दुल पाटील, प्रफुल्ल कदम यांच्या दमदार चढाया, तर साहिल राणे, सतीश पांचाळ यांचा भक्कम बचाव याला या विजयाचे श्रेय जाते. यश मंडळाचा राज खोत देखील चमकला.

आर्य पाटीलने घडवला इतिहास

। उरण । प्रतिनिधी ।

उरणच्या १३ वर्षीय आर्यन किशोर पाटीलने आपल्या वडिलांच्या ५० व्या वाढदिवशी जागतिक विक्रमाची भेटवस्तू देत वडिलांचे स्वप्न पूर्ण केले आहे. आर्यने धरमतर ते कासा खडक हे सागरी २४ किमी अंतर जलतरणातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या ‘बटरफ्लाय’ प्रकारामध्ये पोहून पार करत जागतिक विक्रम केला आहे. बटरफ्लाय प्रकारामध्ये खुल्या समुद्रामधील लांबपल्ल्याचे जलतरण करणारा तो जगातला सगळ्यात लहान जलतरणपटू ठरला आहे. याची नोंद ‘इंटरनॅशनल एक्सीलेन्स अवॉर्ड’ने घेत त्याला सन्मानीत देखील केले आहे.

केगाव दांडा येथे राहणारा आर्य किशोर पाटील हा उरणच्या सेंटमेरीज हायस्कुलच्या इयत्ता ८ वीमध्ये शिकत असून, तो उत्तम जलतरणपटू आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)